सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

Website :www.chaprak.com

■ पुणे ■ वर्ष : ६
■ अंक : ०३
■ पाने : ८
■ मूल्य : ₹ ३

एकदा वापरून पहाच!

KaMant masale

किंग ऑफ टेस्ट

व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले

संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.

तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४, टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजेवाडी, पुणे - ४११ ०५७ दूरध्वनी : ०२०-६५२९ २४००

Email : dkamant@rediffmail.com, www.kamantmasale.com

■ सोमवार, १ ते ७ फेब्रुवारी २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. PCW/159/2014-2016

Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** Posted at Pune PSO on every Wednesday, date of posting 03/02/2016

# चला परिवर्तन घडवूया, साहित्य परिषद बदलूया!

महाराष्ट्र साहित्य परिषद

परिवर्तन आघाडी

**संपादकीय**

घनश्याम पाटील ७०५७ २९२ ०९२

*परिवर्तन* हा सृष्टीचा अटळ नियम आहे. माणसाचे आयुष्य प्रवाही असायला हवे. पाणी एकाच जागी तुंबून राहिल्यास त्याचे गटार होते. साहित्य, नाट्य, नृत्य, शिल्प, संगीत या व अशा कला माणसाला समृद्ध बनवतात. जीवनमान उंचावत त्यांना प्रगल्भतेकडे नेतात. साचलेपण दूर करतात. नवा उत्साह, प्रेरणा देतात. सकारात्मक ऊर्जा वाढवतात. या साऱ्यात माणूस घडविणाऱ्या प्रत्येक संस्थेची जबाबदारी लाखमोलाची आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या दूरदृष्टीतून महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना झाली. त्यातून नवे सृजन घडेल, समाजाची बौद्धिक उंची वाढेल असा त्यांचा कयास होता. साहित्यातील अनेक दिग्गजांनी या मातृसंस्थेचे नेतृत्व केले आणि साहित्यिक जाणीवा समृद्ध केल्या.

हा गौरवशाली इतिहास असला तरी महाराष्ट्र साहित्य परिषदेची आजची स्थिती काय आहे? साहित्याचे व्यापारीकरण झाले आणि बुजगावण्यांच्या खोगीरभरतीमुळे साहित्य परिषदेत साहित्य शोधावे लागते. म्हणूनच परिषदेला साहित्याभिमुख आणि समाजाभिमुख करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. लौकिकाला साजेसे नेतृत्व न लाभणे हे कोणत्याही समाजाचे दुर्भाग्यच! अशावेळी कोणीतरी पुढाकार घेऊन हे चित्र बदलण्याचा प्रयत्न करायलाच हवा! साहित्य, भाषा, संस्कृती याविषयी कळवळ असणाऱ्या प्रा. मिलिंद जोशी, प्रकाश पायगुडे आणि सुनिताराजे पवार या त्रयींनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषदेची परिवर्तन आघाडी स्थापन केली आहे. ही आघाडी परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीला सामोरे जायला सज्ज आहे. परिषदेतील दुकानदारी संपुष्टात येऊन राजकारणविरहीत निर्मळ कारभाराची अपेक्षा या चमूकडून ठेवता येईल.

नामवंत व्यवस्थापन तज्ज्ञ असलेले ८६ वर्षीय निवृत्त प्राचार्य, सुप्रसिद्ध लेखक डॉ. प्र. चिं. शेजवलकर हे सध्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष आहेत. 'प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयापासून मला दूर ठेवले गेले, मी नामधारी अध्यक्ष आहे' असे त्यांना परिषदेच्याच व्यासपीठावरून जाहीरपणे सांगावे लागले यातच सारे काही आले. अशा सज्जन, सोज्वळ वृत्तीच्या आणि प्रत्येकावर भरभरून प्रेम करणाऱ्या बुजुर्गाची ही अवहेलना, त्यांचे शल्य जर आपण समजून घेणार नसू तर आपल्याला मराठी भाषेच्या भवितव्याची चिंता करण्याचा नैतिक अधिकार आहे का?

आमच्या तरूण मित्रांना पुण्यातील पत्ता कळवताना काही वर्षापूर्वी स्थापन झालेले दुर्वांकूर हॉटेल लक्षात येते मात्र साहित्य परिषदेची इमारत काही केल्या कळत नाही. या आद्य साहित्य संस्थेचे हे मोठे अपयश आहे. तरूण पिढी तर सोडाच मात्र परिषदेचे कित्येक आजीव सभासदही या इमारतीकडे फिरकत नाहीत. इथल्या लोकांचे राजकारण, स्वकेंद्रीत वृत्ती आणि अहंकाराचे सतत पिटले जाणारे डांगोरे यामुळे अनेक साहित्य रसिकांचा परिषदेशी सुतराम संबंध राहिलेला नाही. किंबहुना परिषद कोणते उपक्रम राबवते, मराठी भाषा, संस्कृतीच्या संवर्धनासाठी काय करते याचीही कोणाला खबरबात नसते. शालेय विद्यार्थी, तरूण, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ही आद्यसंस्था काही विधायक, रचनात्मक, प्रयोगशील कार्य करते, मराठीचे संवर्धन करते यावर कुणाचा सांगूनही विश्वास बसत नाही. परिषदेच्या मागच्या काही वर्षातील कारभाऱ्यांनी आपल्या अकर्तबगारीमुळे ही नकारात्मक मानसिकता निर्माण केली आहे. उखाळ्या-पाकाळ्या आणि एकमेकातील कलगीतुरे, हेवेदावे, साहित्यबाह्य विषय यामुळेच परिषद चर्चेत राहते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची ही अधोगती रोखण्यासाठी कुणीतरी पुढाकार घेणे ही काळाची गरज होती. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्यानंतर महाराष्ट्रात रसिकप्रिय ठरलेले, लेखणी आणि वाणीवर उत्तम प्रभुत्व असलेले सुप्रसिद्ध साहित्यिक आणि वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांनी काळाची ही हाक ऐकली. त्यातूनच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या परिवर्तन आघाडीची स्थापना झाली. तीस टक्के जुन्या आणि सत्तर टक्के नव्या उमेदवारांचा या आघाडीत समावेश आहे. व्यापारी मनोवृत्तीच्या धनाढ्यांना या निखळ साहित्यप्रेमींनी आव्हान दिले आहे. समोरच्या पॅनलने स्त्रीशक्तीचा अनादर करत एकाही महिलेला स्थान दिलेले नसताना परिवर्तन आघाडीने चार कर्तृत्ववान महिलांना उमेदवारी दिली आहे. विविध वयोगटातले, साहित्याबरोबरच विविध क्षेत्रात गौरवास्पद कामगिरी पार पाडणारे, स्वतःच्या क्षमता विकसित करण्याबरोबरच साहित्य क्षेत्रात योगदान पेरणारे हे उमेदवार आहेत.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सर्व उपक्रम पार पाडतानाच नव्या परिप्रेक्ष्यातून मसापसाठी नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा या परिवर्तन आघाडीचा संकल्प आहे. स्वच्छ, पारदर्शक कारभाराद्वारे साहित्यकारणावर भर देणाऱ्या आघाडीने महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मीकी गदिमांचे पुण्यात यथोचित स्मारक उभारण्याचा मानस जाहीर केला आहे. उल्लेखनीय म्हणजे मसापच्या शाखा विस्ताराबरोबरच या नव्या शाखांच्या आर्थिक सबलीकरणाचा प्रयत्न करून कार्यक्रमांचे विकेंद्रीकरण करणे व शाखांना उपक्रम देणे, फेसबुक-ब्लॉग अशा समाजमाध्यमांद्वारे तरूणाईशी सुसंवाद साधणे, शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, महाविद्यालयातील वाङ्मय मंडळे परिषदेला जोडणे, साहित्यातील विविध प्रवाहात समन्वय साधून सुसंवाद घडविणे, समविचारी साहित्यसंस्थांच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य समीक्षा आणि संशोधनाचे प्रकल्प हाती घेणे, मसापच्या अतिथी निवासाचे व्यवस्थापन अधिक नेटके करून अतिथी निवास सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज करणे, मराठी विषय घेऊन स्पर्धा परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शक मिळावेत यासाठी सहकार्य करणे, मराठी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची अध्यापन क्षमता वृद्धिंगत व्हावी यासाठी प्रयत्न करणे, विविध वाङ्मय प्रकारांसाठी कार्यशाळांचे आयोजन करणे, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या परिषदेच्या त्रैमासिक मुखपत्राचे स्वरूप अधिक संदर्भमूल्य वाढविणारे आणि उपयुक्त करणे, महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणे, मसापच्या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करणे आणि मुख्य म्हणजे मसापच्या आजीव सभासदांचा विविध उपक्रमात सहभाग वाढविणे यासाठी ही परिवर्तन आघाडी क्रियाशील राहणार आहे.

हे सारे शक्य होईल का? असा प्रश्न अनेक वाचकांना पडणे स्वाभाविक आहे; मात्र याहून अनेक उपक्रम या आघाडीच्या समोर असून त्याच्या पूर्तीसाठी सर्व उमेदवार सज्ज आहेत. प्रा. मिलिंद जोशी हे परिषदेच्या इतिहासात सर्वात तरूण कार्याध्यक्ष होतील. प्रकाश पायगुडे यांच्या कार्याची चुणूक साहित्य क्षेत्राने अनुभवलीच आहे. अतिशय जिद्दीने प्रकाशन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सुनिताराजे पवार, 'साहित्यदीप' संस्थेच्या माध्यमातून पुणेकरांना सुपरिचित असलेल्या कवयित्री आणि आदर्श शिक्षिका ज्योत्स्ना चांदगुडे, संपादकीय कामाचा समृद्ध अनुभव असणाऱ्या निलिमा बोरवणकर, कवी, चित्रपट समीक्षक आणि लोकमान्य टिळकांचा वारसा लाभलेल्या 'केसरी' या राष्ट्रीय बाण्याच्या दैनिकात वृत्तसंपादक असलेले स्वप्निल पोरे, ज्येष्ठ लेखिका नंदा सुर्वे, बहुआयामी व्यक्तिमत्त्व अशी ओळख असलेले प्रा. क्षितीज पाटुकले, ॲड. श्रीधर कसबेकर, मसापच्या पिंपरी शाखेचे अध्यक्ष राजन लाखे, डॉ. पुरूषोत्तम काळे, सासवडचे रावसाहेब पवार असे एकाहून एक सरस उमेदवार या परिवर्तन आघाडीत आहेत. कवी आणि शिक्षक वि. दा. पिंगळे हे स्थानिक कार्यवाह म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. लेखक, कवी, प्रकाशक, संपादक, शिक्षक, वक्ते आणि पत्रकार अशा महत्त्वाच्या क्षेत्रातील उमेदवारांचा परिवर्तन आघाडीत समावेश आहे.

**सरतेशेवटी...**

'चपराक'च्या माध्यमातून मराठी साहित्याचा विजयध्वज डौलात फडकावा यासाठी गेली १४ वर्षे आम्ही अव्याहतपणे कार्यरत आहोत. एक दर्जेदार वृत्तसाप्ताहिक, प्रभावी मासिक आणि वैविध्यपूर्ण विषयांवरील वाचनीय पुस्तके प्रकाशित केल्याने 'चपराक'ची वेगळी ओळख निर्माण झालेली आहेच. चुकीच्या प्रवृत्तीला, विविध क्षेत्रातील समाजद्रोह्यांना परखडपणे 'चपराक' देताना आम्ही सातत्याने ठाम भूमिका घेतल्या आहेत. चतुरस्त्र, परखड, रास्त आणि कर्तव्यदक्ष ही आद्याक्षरे घेऊन आम्ही २००२ साली 'चपराक' ही संस्था स्थापन केली आणि त्याद्वारे प्रांजळपणे कार्यरत आहोत. घुमानच्या साहित्य संमेलनातील प्रकाशक परिषदेचा बहिष्कार धाडसाने फेटाळून लावणे किंवा यंदाच्या साहित्य संमेलनाध्यक्षांचा चेहरा आणि मुखवटा वाचकांसमोर आणणे हे आमचे कार्य आपणास ठाऊक आहेच. एकाच वेळी पंधरा-पंधरा पुस्तकांचे प्रकाशन असेल किंवा दीडशेहून अधिक साहित्यिकांचा समावेश असलेला, सहा राज्यात वाचक असलेला तब्बल ४६८ पानांचा 'साहित्य चपराक' दिवाळी अंक प्रकाशित करणे हे सारे कार्य आपण जाणताच. त्यामुळेच बरबटलेल्या राजकारणातून साहित्य परिषदेला बाहेर काढण्यासाठी आम्हीही प्रा. मिलिंद जोशी आणि प्रकाश पायगुडे या द्वयींना समर्थ साथ द्यायची ठरवली. परिवर्तनाच्या या लढाईत म्हणूनच आपले आम्हास सक्रीय सहकार्य, पाठिंबा अपेक्षित आहे. फक्त उमेदवार म्हणून नाही, हितचिंतक म्हणून नाही तर एक साहित्यरसिक या नात्याने, पत्रकार या नात्याने आमची कायम 'जागल्या'ची भूमिका असेल. परिवर्तन आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात जे-जे मांडले आहे त्याच्या पूर्ततेसाठी अहोरात्र प्रामाणिकपणे कार्यरत राहू याची ग्वाही आम्ही देतो. त्यामुळेच विश्वासाने साद द्यावीशी वाटतेय की, 'चला परिवर्तन घडवूया; साहित्य परिषद बदलूया!'

■



# वास्तवाचा स्वीकार हीच म्हातारपणाची काठी

*'जगी* सर्वसुखी असा कोण आहे?' असे समर्थ रामदास स्वामींनी म्हटलं आहे, तर 'ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्ती असू द्यावे समाधान।।' असे संत तुकारामांनी सांगितले आहे. खरंच, सर्वस्वी निर्दोष, सर्वांगसुंदर या जगात कुणी नाही तसाच सर्वस्वी सुखीही कुणी नाही; मात्र निसर्गाने आपल्याला दिलेल्या आयुष्याचा आनंदाने स्वीकार करून सुखी-संपन्न जीवन जगणे आपल्याच हाती असते. ह्या संपन्न जीवनाचा खरा शिल्पाकार आपण स्वतःच असतो. म्हणूनच वास्तवाचा स्वीकार हीच आपल्या म्हातारपणाची काठी आहे, असं मला वाटतं.

एकत्र कुटुंब पद्धतीपेक्षा विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललंय. रक्ताच्या, जवळच्या नात्यात दुरावा निर्माण होतोय हे कट सत्य आहे. घरातील वडिलधारी माणसे आपापल्या कुटुंबातील नात्यांची गुंफण जपण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु काळानुसार मानवी संस्कृती, आचार विचारात बदल करण्याची गरज भासू लागलीय. व्यवसाय, नोकरी, संशोधने, उत्पादने, देशाची प्रगती यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्ये हवी असतात, त्यासाठी तरूणांना आपले घर, नातेवाईक, गाव, क्वचीत कधीकधी देशही सोडून बाहेर जावे लागते. असे बदल करताना कुटुंबातील व्यक्तींमध्ये बऱ्याचदा नव्या-जुन्या विचारांची सांगड घातली जात नाही. परिणाम काय? तर पालक-मुले यांच्यात मतभेद, कलह, द्वेष व शेवटी दुरावा निर्माण होतो.

आपल्या मुलांनी खूप शिक्षण घेऊन मोठ्ठे व्हावे, समाजात, देशात, जागतिक पातळीवर चांगले नाव मिळवावे, आर्थिकदृष्ट्या संपन्न होऊन म्हातारपणी आपल्याला साथ द्यावी हे प्रत्येक आईवडिलांना वाटत असते. मुले म्हणजे त्यांना चिमणी पाखरे वाटतात. लहानपणापासून मुलांचे उत्तम संगोपन करण्यावर त्यांचा भर असतो. मुलांच्या पंखात बळ यावे, त्यांनी उत्तुंग भरारी मारावी, भावी आयुष्यात नाव कमवावे यासाठी पालक सतत प्रयत्नशील असतात; पण हे सर्व करताना हीच चिमणीपाखरे पंख फुटल्यावर स्वतंत्रपणे विहार मात्र सहसा पालकांच्या मनातही येत नाही.

कालांतराने मुले मोठी झालेली असतात. स्वतःच्या भवितव्याचा विचार ती स्वतंत्रपणे करू लागतात आणि माझ्या मते हाच काळ पालक व मुले दोघांच्याही भविष्यकाळाच्या दृष्टिने महत्त्वाचा असतो. यावेळी दोघांनीही एकमेकांच्या विचारांनी सुसंवाद साधून पुढील जीवनाचा मार्ग निवडायला हवा. नाहीतर मानसिक अंतर पडून भावनिक विसंवाद घडू लागतात. लहान-लहान गोष्टींतून वाद होतात. प्रत्येक गोष्टीसाठी आईबाबांचा सल्ला घेणारी मुले, त्यांना दूर ठेवून, हळूहळू स्वतःच निर्णय घेऊन टाकतात. हे समजल्यावर पालक दुखावतात. हळव्या मनाच्या पालकांना याचा जास्त त्रास होतो. निमूटपणे गप्प बसून जीवन जगतात. बहुधा त्यांच्या मनात 'मुले म्हणजे म्हातारपणची काठी. त्यांना दुखवून कसे चालेल?' असा विचार असावा. रागीट, स्पष्ट बोलणारे पालक मात्र सतत वाद घालत, भांडत राहतात.

त्यानंतर नोकरी, व्यवसायाचे निमित्त साधून, गावातल्या गावातच राहून मुले वेगळा, स्वतंत्र संसार थाटतात, दुसऱ्या गावी जातात नाही तर आईवडिलांना भारतातच ठेवून परदेशी निघून जातात. अशावेळी आईवडिलांना एकमेकांच्या सहाय्याने परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे. केवळ आर्थिकदृष्ट्या तरतूद करनू भागत नाही. आपल्या भोवतालची मित्रमंडळी, नातेवाईक, शेजारी या सर्वांशीच चांगले संबंध ठेवले पाहिजेत. मुले दूर गेल्यावर याच सर्वांचा आधार मिळतो.

तरूणपणात नोकरी व्यवसाय करतानाच प्रत्येकाने कोणता ना कोणता चांगला छंद जोपासला तर म्हातारपणी त्याच्या आधारे जीवन आनंदी होऊ शकते. याबाबतीत गृहीणीनेही मागे राहून चालणार नाही. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वास्तवाचा स्वीकार केला तर आपणही आपले जीवन आनंदात घालवू शकतो. परदेशी गेलेली मुले सहसा इकडे परत येण्यास तयार नसतात. आपल्याला तिकडे बोलावले तरी या वयात तेथे आपण कायम राहू शकत नाही. देशात-परदेशात कुठेही असली तरी मुलांच्या विश्वामध्ये ती सुखी असतात. मग आपण म्हातारपणी आपले जीवन आपल्या परीने, सुखाने जगण्यातच शहाणपणाचे ठरते. भावी आयुष्यात परदेशातील मुलांनी तेथेच रहावे का भारतात परत यावे हे त्यांचे त्यांनीच ठरवावे. आपण आपली मते त्यांचेवर लादू न देणेच योग्य. या वयात लेखन-वाचन, संगीत ऐकणे, निरनिराळे कार्यक्रम पाहणे, जागा मोठी असेल तर बागकाम, कात्रणांचा संग्रह, मित्र-मैत्रिणींशी संवाद, सामाजिक कार्याची आवड असल्यास आपल्या कुवतीनुसार करणे, प्रसंगानुरूप नातेवाईकांच्या भेटी-गाठी इत्यादी अनेक प्रकारांनी आपण स्वतःला गुंतवून ठेवू शकतो. जीवनात आनंदी राहू शकतो.

आज माझे वय ७३ वर्षे असून ४ वर्षांपूर्वी खेळाडू पती दत्ताजी शिंदे यांचे निधन झाले. जवळजवळ १८ वर्षे दोन्ही मुले, सुना, नातवंडे परदेशात आहेत. आम्ही दोघे बऱ्याचदा त्यांचेकडे जाऊन आलो पण भारतातच राहणे आम्ही पसंत केले. लेखामध्ये उल्लेख केलेल्या सर्व गोष्टी आचरणात आणल्यामुळे दोन्ही मुलांच्या कुटुंबाशी आमचे संबंध नेहमीच चांगले राहिले आहेत. आवडत्या छंदांमध्ये स्वतःला गूंतवून मी आनंदी जीवन जगत आहे.

■ **आशा शिंदे**, पुणे मो. ९८२२६१०७३१



# करड्याची भाजी...

**सचिन वसंत पाटील**
कर्नाळ , जि सांगली
मो. ८२७५३ ७७०४९

***घराबाहेरल्या*** चौकात उभा राहिलेलो. काही काम-धाम नसलं की असा उभा राहतो मी चौकात. घर कोंबडीगत बसून-बसून कंटाळा आलेला असतो. तेवढीच नवनवी माणसं बघितली की मनाला तुकतुकी येते. माणसांच्या बरोबर बोलायला मिळतं.

कोणी फेरीवाला आला की पहायला मिळतो. तो काय घेऊन आलाय? दर कसाय?... उगी फुका चौकशी. कुणी माळवंवाली बाई आली. गल्लीतल्या बायका जमतात. यडबडून सोडतात तिला... आजही असाच उभा राहिलेलो चौकात. एक बारा चौदा वर्षाचा मुलगा डोक्यावर बुट्टी घेऊन आला. ओरडू लागला... 'भाजी घ्या भाजी...'

मी त्याला जवळ बोलावलं आणि विचारलं, 'कसली भाजी?' तो म्हणाला 'करड्याची' भाजी हिरवीगार कवळीलुस होती.

'कितीला पेंडी?' मी पेंडी हातात घेऊन बघीतली.

'पाच रूपैला एक'

'दोन पेंड्या दे बाबा' मोठ्या बघून दोन पेंड्या मी उचलल्या. दहा रूपयची कोरी नोट मी त्याच्या हातावर ठेवली. पोरगं खुललं. धुमाट पळत गेलं...

मी सहावीला होतो तवाची गोष्ट. परिक्षेची फी भरायची होती. फी होती अठरा रूपये, पण तितके पैसेही आम्हा गरिबाकडे नव्हते. थोडकी शेती. उत्पन्न जवळजवळ नाहीच. शाळू व्हायचा खायापुरता. मोगन घातलेली तुर असायची, तीची डाळ आमटीला व्हायची. मधीआधी सुर्यफुल टोकनलेला. आडतासाला करडा घातलेला असायचा. कशीबशी वर्षभराची बेगमी व्हायची. हातातोंडाची गाठभेट होईस्तोर बोंब. आमची जनावरबी होती. एक म्हस, दोन जर्सी गायी, एक मोठी कालवड आणि दोन तीन चिल्लीपिल्ली. साठाभर वैरण लागायची रोज. वैरण आणायला एक घोडागाडीबी होती. पेंडीची पोती तर तीन- चार लागायची. त्यातली एक म्हस आणि एक गयी तेवढी दूध द्यायची. बाकी सगळी भाकड. दूधाचं पैसे तेंचं त्यास्नीच जायाचं. गवळ्याकडनं आधीच उचल आणलेली असायची. मग महिन्याच्या महिन्याला हाती काहीच यायचं नाही. घरात कायम पैशाचा खडखडाट.

आठ दिवस घरात पैसे मागूनही मिळेनात. मग आईनंच एक दिवस युक्ती सांगितली ''रानात करडा भाजीला आलाय त्यो काढून पेंड्या बांधून विकजा...'' सकाळी लवकर उठायचो. जनावरांचं शेणघाण माज्याकडंच असायचं. थंडीत उठून शेणात हात घालायला नको वाटायचं. तरी शेणघाण आवरून दिस उगवायला रानात टच व्हायचो. शाळू जोमात आलेला असायचा, हिरवीगार कवळीलुस करड्याची भाजी खावी की गिळावी वाटायची. इतकी लुसलुसीत दिसायची.

आता भाजीला करडा काढायचा म्हणजे तो चिमटायला हवा. चिमटणे म्हणजे पेरताना दाट झालेल्या रोपांची विरळणी करायची असते. वितभर अंतरावरलं एक ठोसदार रोप ठेवायचं आणि बाकी सगळी गर्दी झालेली रोपं उपसून काढायची. त्यांची भाजी करायची. वेळ लागायचा या कामाला. हवी तेवढी भाजी उपडून चेंबरावर धुऊन घ्यायची. त्याचं गट्टूळं बांधून मी घराकडं यायचो. केळीच्या सोपटाचे धागे काढून पेंड्या बांधायचो. तोवर शाळेला जायची वेळ झालेली असायची. बांधलेल्या पेंड्या सुकू नयेत म्हणून ओल्या केलेल्या पटकुरात गुंडाळून ठेवायचो.

मधल्या सुटीत येऊन भाजीवर पाणी शिंपडायचो. भाजी सुकू नये म्हणून... शाळा सुटायची. कळकाची एक मोठी डालपाटी घ्यायची. काठाकाठावरनं गोल पेंड्या मांडायच्या. गोल आतआत येत पेंड्यांची वेगळीच नक्षी तयार व्हायची. दुपारी पाणी मारलेली भाजी फुलारून आलेली असायची. लय भारी दिसायची.

बुट्टी डोक्यावर घेऊन मी भाजी विक्रीला बाहेर पडायचो. 'भाजी घ्या भाजी... ताजी ताजी भाजी... करड्याची भाजी...!' एक एक गल्ली धरून मी ओरडत सुटायचो. बायाबापड्या जमायच्या. कोण भाजी घ्यायच्या कोण नुसतीच चौकशी करायच्या...

'कितीला पेंडीरे पोरा '

मी म्हणायचो, 'चार आण्याला एक'

मग बाया दरात घासाघीस करायच्या... दहा पैशाला दे, पंधराला पेंडी दे अशी. काही काही तर चार आण्याला दोन पेंड्या मागायच्या. लई राग यायचा. थंडीत उठून हाताचा आकडा होईस्तर उपडलेली भाजी आठवायची... पण नाईलाज असायचा. कुठंतरी पंधरा-वीस पैशाला सौदा करावा लागायचा.

शाळेतल्या पोरापोरींची घरे चुकवून मी फिरू लागलो... चुकून वर्गातली एखादी पोरगी वाटंत भेटलीच तर लाजून मेल्यागत व्हायचं. पोरं तर बाराबेण्याची मुद्दाम लांबनं कुठणंतरी हाळी मारायची... ये भाजीवाल्या... तिथं पोचलं की आणखी लांबनं हाळी यायची... कोण भाजी घ्यायची नाहीत. उगी माझी तंगडतोड करून गंमत बघायची.

पहिल्या दिवशी एक रूपये सत्तर पैशांची विक्री झाली. दुसऱ्या दिवशी अधिक जोमानं भाजी काढली. लवकर फिपुरते पैसे जमावेत म्हणून... पण भाजीच कोण घेईना. गावातली गल्ली न गल्ली फिरली पर भाजी कोण घिणा. दोन तास ओरडून घसा खरवडून गेला. भूक लागली. डोक्यावली बुट्टी लईच वज्री झाल्यागत वाटाय लागली. तसाच पायवडत घराकडं आलो. बुट्टी उतरून खाली ठेवली. दोन तास हिंडून नुसती एकच पेंडी खपलेली. बुट्टीजवळ बसलो. एकदा आलेल्या विस पैशाच्या षटकोणी नाण्याकडं एकदा भरलेल्या बुट्टीकडे टकमक बघत राह्यलो... आई पाठीवरनं हात फिरवू लागली तसं डोळं भरून याय लागलं...

वडील कामानिमित्त सांगलीला गेलेले अजून आले नव्हते. आई म्हणाली, 'जनावरास्नी वैरण टाकुन येजा'

तसाच उठलो अन गोठ्याकडं गेलो. अंधार पडलेला. गोठ्यात लाईट नाही. कंदिल आहे पण त्यात रॉकेल नाही. भराभरा कोपऱ्यातल्या गवताच्या पेंड्या उपसल्या. सगळ्यास्नी एकेक टाकली. मागं शेणाचा पु दिसला. तसाच मागं जाऊन खराटा हुडकला. म्हशीला बाजूला सारून खराट्यानं शेण सरकवू लागलो. एवढ्यात काय झालं कुणास ठाऊक... मोठी कालवड जरा माझ्याकडं सरकली आणि करकतुन तिनं मला एक लात हाणली. तोंडातनं आई सुदी निघालं नाही. इतक्या जोरात माझ्या मांडीवर लाथ बसली. छत्री उडाल्यागत मी मागं उडून पडलो. चिमणीएवढा जीव चोळामोळा झाला. हुक भरल्यागत झालं. रडावं म्हंटलं तरी तोंडातून शब्द येईना. दोन्ही हातांनी मांडी गच धरली. कळ दाबून चोळत राहिलो. जीव गोळा करून उठलो... पाय मोडलेल्या कुत्र्याच्या पिल्ल्यागत घराकडं लंगडत लंगडत आलो.

आईनं चिमणी लावून बघितलं. रबरी बॉलगत मांडीवर लालभडक टण्णू उठलेला. वडील आल्यावर कालवडीला काठीनं बडवली. आईनं शिव्यांची लाखखोली वाहिली. तेल हळद लाऊन पाय शेकला. दुखणं थोडं कमी झालं पण रातभर पायात ठणका उठला. वाईट याचंच वाटत होतं की, मला उद्या भाजी विकायला जाता येणार नाही.

दुसऱ्या दिवशी पाय लईच सुजला. कुणी सांगितलं गुडघंमोडीचा पाला चेचून लावा. भाऊनं पाला आणून रस पिळला. काही फरक पडला नाही. कुणी सांगितलं बंदूकीचा पाला चेचून फडक्यात बांधा. बांधला. चांगला दोन दिवस बांधला. वरनं तापलेल्या तव्यावर फडकं ठेऊन शेकून घेतलं.

जरा उतार पडला. दोन दिवस शाळा बुडलेलीच. भाजीही काढली नव्हती. लंगडत लंगडत शाळेत गेलो. पुन्हा सरांनी फी मागीतली...

सकाळी लवकर उठून भाजी काढली. भाजी आता थोडी निबर झालेली. लंगडत लंगडत गावात फिरू लागलो. 'भाजी घ्या भाजी... ताजी ताजी भाजी... करड्याची भाजी...' रोज रूपया दिड रूपया व्हायचा. कधी कधी काहीच मिळायचं नाही. शिल्लक राहिलेली भाजी आई शेजाऱ्यास्नी, ओळखीच्या लोकांना वाटून टाकायची.

पंधरा दिवसात फीपुरते पैसे माझ्याकडे जमले. फी भरली. हळूहळू पायही बरा झाला...

आज वीस बावीस वर्षानंतर त्या भाजी विकणाऱ्या मुलाला पाहून हे सगळं आठवलं. आज विकण्यासारखी भाजी माझ्या शेतामध्ये भरपूर आहे पण ती गावभर फिरून विकायला माझ्याकडे पाय नाहीत..!! ■

# मानवाधिकाराची बाधा



**भाऊ तोरसेकर**
भ्रमणध्वनी ९७०२१ ३४६२४

**चौदा** इसिसचे हस्तक पकडले म्हणून सध्या मोठा डंका पिटला जात आहे. त्यातून काय साध्य होणार आहे? देशाला दहशतवादाचा असलेला धोका संपला असे म्हणावे काय? तसे असते तर खूप पुर्वीच जिहादच्या सावलीतून आपण बाहेर पडू शकलो असतो. पण अमेरिकेसह पाश्चात्य देशांनाही अजून त्या संकटावर मात करता आलेली नाही. कारण यापैकी कोणालाही खऱ्या समस्येला हात घालायची इच्छा नाही. तसे असते तर श्रीलंकेने घालून दिलेल्या उदाहरणाचे अनुकरण करून बहुतेक देशांनी जिहाद वा दहशतवादाचे कधीच समूळ उच्चाटन केले असते. मागल्या चारपाच वर्षात श्रीलंकेत कुठलाही घातपात होऊ शकला नाही. तब्बल चार दशके तिथे धुमाकुळ घालणाऱ्या तामिळी वाघांचा असा बंदोबस्त करण्यात आला, की ती विषवल्ली पुन्हा डोके वर काढू शकणार नाही. मात्र त्यात नुसते सरकार वा लष्कराची कारवाई पुरेशी नव्हती. त्यासाठी श्रीलंकेने तथाकथित मानवाधिकार झुगारण्याचे धाडस दाखवले आणि म्हणूनच त्यांना इतके मोठे यश मिळू शकले. कारण आता जगभरच्या तमाम देशांना जिहाद वा दहशतवाद भेडसावतो आहे, त्याची खरी जननी मानवाधिकाराचे थोतांड हेच आहे. किंबहूना मानवाधिकारांनी जगभरात जिहादी हिंसेचे पालनपोषण केले आहे. म्हणूनच जोवर मानवाधिकाराचे चोचले चालणार आहेत, तोवर दहशतवाद बोकाळतच राहील यात शंका नाही. श्रीलंकेने तेच चोचले केले आणि किरकोळ वाटणारा तामिळी वाघ अधिकच चटावलेले श्वापद होऊन गेला. जगभरच्या मानवाधिकार संघटना व त्यांचे श्रीलंकेतील दलाल हिंसेला पाठीशी घालत होते, तोवर श्रीलंका त्यावर मात करू शकत नव्हती. जेव्हा वाघ दुबळे व्हायचे, तेव्हा लष्करी कारवाईला खोडा घालायला मानवाधिकार संघटना मध्यस्थी करायच्या आणि वाघांची स्थिती सावरली मग पुन्हा हिंसेचा भडका उडायचा. श्रीलंकेने त्यातूनच प्रथम आपली सुटका करून घेतली. पुढे काम सोपे होऊन गेले.

एकदा मानवाधिकाराच्या मुसक्या बांधून झाल्यावर श्रीलंकेच्या सरकारने तामिळी वाघांना मुदत घालून दिली. जाफनामध्ये दडी मारून बसलेले जे कोणी लोक होते, त्यात दहशतवादी नसतील, त्यांनी अमूक दिवसात जाफना सोडून बाहेर यावे. मुदत संपली मग शिल्लक उरतील त्यांना दहशतवादी समजून त्यांना नि:पात केला जाईल, असे बजावण्यात आलेले होते. झालेही तसेच! मुदत संपताच युद्धपातळीवर लष्कराने जाफनावर चाल केली आणि चारी बाजूंनी कोंडी करून एकेकाला टिपून मारले. त्यात जे शस्त्र खाली ठेवून शरण येत होते, त्यांना जीवदान मिळाले; पण शस्त्र रोखून लढणाऱ्यांना निर्दयपणे ठार मारण्यात आले. ते मानवाधिकार कायदे व कराराचे संपुर्ण उल्लंघन होते, यात शंका नाही; पण त्याचेच पालन करताना जो हिंसाचार चार दशके चालला, त्यामध्ये जितकी माणसे हकनाक मारली गेली होती, त्याच्या तुलनेत लष्कराने मारलेली लोकसंख्या नगण्य होती. म्हणजेच मानवाधिकाराच्या सव्यापसव्याने जितके निरपराध मारले गेले, त्यापेक्षा मानवाधिकार झुगारल्याने अधिक वाघ मारले गेले. म्हणजेच मानवाधिकाराच्या पायमल्लीने नुसती सुरक्षाच आणली नाही, तर कित्येक हजार निरपराधांना जीवदान दिले. त्यामुळे अर्थातच मानवाधिकाराचे पुरस्कर्ते खवळून उठले आणि त्यांनी श्रीलंकेत तपासणी पथके पाठवण्याचा तमाशा सुरू केला. तिथल्या सरकारने त्याला दाद दिली नाही आणि कुठल्याही मानवाधिकार संघटनेला श्रीलंकेत यायलाच प्रतिबंध लागू केला. राष्ट्रसंघापासून अनेकांनी त्यावर श्रीलंकेला धारेवर धरले; पण तो देश अशा दडपणाला बधला नाही. मागील काही वर्षे श्रीलंकेसारखा जगात दुसरा कुठलाही देश सुरक्षित नसेल. खलीस्तान वा काश्मिरच्या दहशतवादाने भारताला भंडावून सोडले, तेव्हापासूनच श्रीलंकाही त्याच दहशतवादाच्या फेऱ्यात फसलेली होती. त्यांची मुक्तता होऊ शकली. आपण मात्र तिथेच घुटमळतोय.

कारण सोपे आहे. भारताला किंवा श्रीलंकेला जिहाद वा दहशतवादाने सतावलेले नाही. आपण मानवाधिकाराचे बळी आहोत. कारण आज जगभरच्या हिंसाचार दहशतवाद वा गुन्हेगारीचा सर्वात मोठा प्रयोजक मानवाधिकार झाला आहे. कोणताही गुन्हा वा हिंसा करावी आणि मानवाधिकाराच्या पदराआड जाऊन लपावे, हीच गुन्हेगारी रणनिती झाली आहे. मानवाधिकार हे गुन्हेगारी वा दहशतवादी हिंसेचे सर्वात अभेद्य चिलखत झाले आहे. जिहादींपासून माफिया वा नक्षलवाद्यांपर्यंत प्रत्येकाला आज कायद्याची वा शिक्षेची भिती उरलेली नाही. म्हणूनच तर गुन्हेगार कायद्याच्या ममतेने पोसले जात आहेत. इशरत जहान असो किंवा सोहराबुद्दिन, अफजल गुरू वा याकुब मेमन असोत, त्यांना वाचवायला कायदा जितका धावपळ करतो, तितका त्यांच्याकडून बळी पडलेल्यांना कायदा संरक्षण देवू शकत नाही. निर्भयावर बलात्कार करणाऱ्याच्या अधिकारासाठी कायदा कसा धावला, हे आपण बघितले. ही आजची समस्या आहे. कारण ज्या कृतीला सतत प्रोत्साहन मिळते वा पाठीशी घातले जाते, ती कृती करण्याकडे सामान्यपणे मानवी कल असतो. शिक्षणाला प्रोत्साहन द्या माणसे शिक्षित व्हायला पुढे येतात. क्रिकेटला प्राधान्य मिळते म्हणून प्रत्येकाला क्रिकेटपटू व्हायचे असते. बाकीच्या खेळाकडे लोक फिरकत नाहीत, कारण त्यांना प्रोत्साहन नसते. समाजसेवा करण्यापेक्षा क्रांतीच्या नावाखाली हिंसाचार माजवायला प्रोत्साहन मिळत असेल, तर याकुब वा अफजल गुरूच निर्माण होणार ना? शेकड्यांनी चांगली मुस्लिम मुले देशकार्य करताना सापडतील, त्यांच्या पाठीशी कितीजण उभे राहताना दिसतात? पण याकुबला मिळणारी मदत मुस्लिम तरुणाला जिहादकडे आकर्षित करत असेल, तर नवल नाही. मदरशात जिहादी निर्माण केले जातात ही चुकीची समजूत आहे. जिहादी हे मानवाधिकाराच्या शेतात पिकतात पोसले जातात.

आज म्हणूनच खेड्यापाड्यापर्यंत जिहादकडे मुस्लिम मुले आकर्षित होत आहेत. कारण देशातले तथाकथित बुद्धिमंत मानवतावादी तशा हिंसाचारी मुस्लिमांच्या पाठीशी उभे राहताना दिसतात. इशरत वा सोहराबुद्दीन यांच्यासाठी धावपळ करणाऱ्यांनी कधी गुणी मुस्लिम तरूणांच्या सत्कार्याला प्राधान्य वा प्रोत्साहन दिलेले आपण बघतो काय? मग त्या मुलांनी चांगल्या कृतीकडे वळावे कसे? ज्यांच्याकडून हिंसक दहशतवादी घातपाती कृत्ये घडली, त्यांच्याच समर्थनाला घाऊक दराने बुद्धिमंत मान्यवर उभे राहिले, तर धर्माच्या नावाने उच्छाद घालण्याकडे कल जाणे स्वाभाविक आहे. तशाच गोष्टीची शिकवण देणारे मदरशे असतीलही; पण तिथे जाऊन घातपाती कृत्य करणाऱ्यांना जे लोक प्रोत्साहन देतात ते खरे गुन्हेगार आहेत. त्यात तमाम मानवाधिकारी संस्थांचा पुढाकार दिसेल. म्हणूनच देशाला वा जगाला धोका मानवाधिकाराचा आहे. कारण त्याच विकृत प्रवृत्तीने जगभरच्या हिंसेचे पोषण चालविले आहे. त्यापासून मुक्ती हवी असेल, तर मानवाधिकाराचा अतिरेक आधी मोडीत काढावाच लागेल. जे धाडस श्रीलंकेने सर्वात आधी केले आणि दहशतवादापासून त्या देशाची कायम मुक्तता होऊ शकली. मानवाधिकाराला कधीच आपल्या भूमीत स्थान दिले नाही अशा अरबी देशात जिहाद वा गुन्हेगारी पोसली जाऊ शकलेली नाही. चीनसारख्या देशातही मानवाधिकाराला फारसे स्थान नाही. परिणाम तिथे दहशतवादाची बाधा नाही. उलट पाश्चात्य देश किंवा जिथे म्हणून मानवाधिकाराचे थोतांड माजवले गेले आहे; तिथेच दहशतवादाने आपले साम्राज्य निर्माण केलेले दिसेल. भारतात इसिसचे मुठभर लोक पकडून उपयोग नाही. जोवर त्यांना मानवाधिकाराची कवचकुंडले लाभलेली आहेत, तोवर त्यांचा बालही बाका होऊ शकत नाही. त्यापैकी कोणालाही पकडले जाण्याची भिती नाही. कारण समस्या दहशतवाद किंवा जिहादची नसून मानवाधिकार ही खरी बाधा आहे. ■

## संक्षिप्त

समीर नेर्लेकर
मो. ९४२२५ ०८४७१



# दंगल



**फाळणीचे** दिवस. सीमेलगतच्या एका छोट्या शहरात दोन समुदायांमध्ये प्रचंड तणावाचे वातावरण होते. कोणत्याही क्षणी जातीय दंगल भडकू शकते अशी परिस्थिती होती. काही भागात जाळपोळ आणि दगडफेकीचे प्रकारही घडले होते. सामान्य लोकांना रस्त्याने चालतानाही जीव मुठीत धरुन चालावे लागायचे.

''आता आपल्याला हे शहर सोडून दुसरीकडे जावेच लागेल. इथे राहणे अजिबात सुरक्षित नाही,'' सेवानिवृत्त वृद्ध शिक्षकाची मुलगी त्याला समजावून सांगत होती.

मुलगाही पुढे येऊन म्हणाला, ''हो, मला देखील असंच वाटतंय. या जुन्या हवेलीत काय ठेवलंय! आपण एखाद्या मोठ्या शहरात जाऊन रहायला हवं.''

वृद्ध शिक्षक म्हणाला, ''अरे मुलांनो, तुम्ही काळजी करू नका. ही परिस्थिती फार काळ टिकणार नाही. सगळीकडे शांतता तर आहे. थोडा तणाव असला तरी तो निवळेल हळूहळू. तेवढ्यासाठी आपली ही वडिलोपार्जित हवेली सोडून जाण्याची काहीच गरज नाही.''

इतक्यात हवेलीच्या मुख्य दरवाजाची कडी वाजली. बहीण-भाऊ दोघेही घाबरले. मुलाने आवाज दिला, ''कोण आहे?'' बाहेरुन आवाज आला, ''मी आहे, टेलरचा मुलगा.''

''बेटा, जा उघड दरवाजा,'' वृद्धाने मुलाला सांगितले. ''कसं काय उघडू? तो आवाज तर वेगळ्या धर्माच्या माणसाचा वाटतोय. त्याने हवेलीत शिरुन घातपात केला तर, मुलाने आपली शंका बोलून दाखवली.''

''घाबरु नकोस. तो आवाज मला ओळखीचा वाटतोय. फार वर्षापूर्वी मी शहरातल्या एका टेलरला शिलाई मशीन खरेदी करण्यासाठी पैसे दिले होते. तो वेगळ्या धर्माचा असला तरी तो माझा चांगला मित्र आहे. दरवर्षी तो न चुकता त्यांच्या सणाच्या दिवशी मला मिठाई देण्यासाठी येत असतो. आत्ता जो बाहेर आलाय तो त्याचाच मुलगा असावा. उघड दरवाजा.''

मुलाने दरवाजा उघडला. एक तरुण हातात मिठाईचा डबा घेऊन आत आला. तो वृद्धाला म्हणाला, ''मी टेलरचा मुलगा आहे. सहा महिन्यांपूर्वी माझे वडील वारले. मरताना त्यांनी मला सांगितले की सणाच्या दिवशी तुमच्या हवेलीवर मिठाई देण्याची प्रथा चालू ठेव. म्हणूनच मी ही मिठाई घेऊन आलो आहे.''

मिठाई देऊन तो तरुण बाहेर गेला. वृद्ध मुलांना म्हणाला, ''बघा, मी तुम्हाला सांगितलं ना. तुम्ही उगाचच संशय घेतलात.''

तो तरुण हवेलीच्या बाहेर येऊन उभा राहिला. तिथे हातात मशाली धरुन उभ्या असलेला जमावाला तो म्हणाला, ''हवेलीचा दरवाजा उघडा आहे. आत तीन माणसं आहेत. माझं कर्तव्य मी पार पाडलं. आता तुम्हाला जे करायचं आहे, ते तुम्ही करु शकता!'' ■

(मूळ उर्दू कथा : सआदत हसन मंटो)




शिवदिग्विजयाची रोमांचकारी कहाणी

**शिवप्रताप**

छत्रपती शिवाजी महाराज आणि अफझलखान यांच्या भेटीचे रोमहर्षक वर्णन करणारी, प्रतापगडाची महती सांगणारी ही कादंबरी आपण वाचायलाच हवी.

लेखक: **उमेश सणस**
चपराक प्रकाशन, पुणे
पाने ४२४ । मूल्य: रु. ३४५/-
संपर्क: ०२०-२४४६ ०९०९
मो. ७०५७२ ९२०९२

# महाराष्ट्र साहित्य परिषद परिवर्तन आघाडीचे उमेदवार



कार्याध्यक्ष या पदासाठी

**प्रा. मिलिंद जोशी** (ललित लेखक, कथाकार आणि वक्ते)

बी १/१२, रविराज टेरेस, राठी बिल्डर्स, सुखसागरनगर, कात्रज, पुणे ४११ ०४६

**भ्रमणध्वनी:** ९८५०२ ७०८२३

**ई-मेल:** joshi.milind23@gmail.com

**शिक्षण**– स्थापत्यअभियंता

प्राध्यापक, भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

लेखन ■ दै. सकाळ, सामना, लोकमत, लोकसत्ता, संचार, देशदूत, महाराष्ट्र टाईम्स, पुढारी, दिव्य मराठी, केसरी, प्रभात यांसह सर्व नामवंत वृत्तपत्रांतून आणि मासिकातून तसेच दिवाळीअंकातून विविध विषयांवर विपुल लेखन. ■ दै. लोकसत्ता (चतुरंग पुरवणीतील – बोधिवृक्ष), दै. महाराष्ट्र टाईम्स (प्रोफेसर्स कॉर्नर), दै. सकाळ (ऐसी अक्षरे रसिके मेळवीन), दै. लोकमत (मुळारंभ) या सदरातील लेखनाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद ■ दूरचित्रवाणी आणि आकाशवाणीसाठी अनेक मान्यवरांच्या मुलाखती आणि लेखन. आकाशवाणीवरील चिंतन या सदरासाठी लेखन. ■ 'अंतर्नाद' या मराठीतील दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकात सलग साडेचार वर्षे पुस्तक परीक्षणाचे सदर लिहिले. ■ गीतरामायणाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त गदिमा प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या 'अवघ्या आशा श्रीरामार्पण' या स्मरणिकेचे संपादन केले.

**प्रकाशित साहित्य** – ■ परिघातील विश्व (ललित लेखसंग्रह) ■ आठवणीतले शिवाजी सावंत ■ चरित्रं अशी घडतात ■ प्राचार्य (शिवाजीराव भोसले यांचे चरित्र) ■ नायजेरियात धोंडे पाटील (एका कृषिशास्त्रज्ञाची यशोगाथा) ■ आपली मुलं घडविताना ■ तमाच्या तळाशी (कार्पोरेट जीवनाचे चित्रण करणारा कथासंग्रह) ■ हसण्यावारी (विनोदी लेखसंग्रह) ■ संतसाहित्य आणि आजची पिढी ■ शिक्षणातील आनंदयात्री (कै. पु. ग. वैद्य स्मृतिग्रंथ) ■ पानगळ (कथासंग्रह) ■ ऐसी कळवळ्याची जाती (व्यक्तिचित्रसंग्रह) ■ शुभंकरांचा सांगाती (कवी दत्ता हलसगीकर स्मृतिग्रंथाचे संपादन)

**व्याख्याने** – ■ पुण्याच्या नामवंत वसंत व्याख्यानमालेसह महाराष्ट्रातल्या आणि बृहन्महाराष्ट्रातल्या सर्व व्याख्यानमालांतून विविध विषयांवर व्याख्याने ■ इंदोर, भोपाळ, ग्वाल्हेर, झाशी, हैद्राबाद, गुलबर्गा, गोवा, बडोदा, अहमदाबाद, छत्तीसगड, बेळगाव, कारवार, निपाणी, बेळगुंदी येथे व्याख्याने ■ अमेरिका, सिंगापूर, दुबई, आबुधाबी, मलेशिया येथेही व्याख्याने ■ अरविंद आश्रम दिल्लीच्या वतीने नैनिताल येथे सलग आठ दिवस रोज दोन तास 'योगी अरविंद चरित्र आणि तत्त्वज्ञान' या विषयावर व्याख्याने ■ विवेकानंदांच्या १५० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्रात स्वामी विवेकानंदावर शंभर व्याख्याने दिली. ■ गीतरामायणाच्या हीरकमहोत्सवी सोहळ्यात डॉ. बालाजी तांबे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, गुरुदेव शंकर अभ्यंकर यांच्यासमवेत व्याख्यानासाठी निमंत्रित.

पारितोषिके – ■ 'प्राचार्य' या चरित्र ग्रंथाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा सह्याद्री साहित्य पुरस्कार ■ 'हसण्यावारी' या विनोदी लेखसंग्रहाला कै. चिं. वि. जोशी साहित्य पुरस्कार ■ 'संतसाहित्य आणि आजची पिढी' या ग्रंथाला मातृमंदिर विश्वस्त संस्था, पुणे यांचा संतसाहित्य पुरस्कार ■ महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा, पुणे यांचा डॉ. निर्मलकुमार फडकुले साहित्य पुरस्कार ■ उत्कृष्ट लेखनासाठीचा कै. अनंत काणेकर पुरस्कार ■ साने गुरुजी विचार साधना पुरस्कार ■ 'तमाच्या तळाशी' या कथासंग्रहाला डॉ. बनहट्टी आणि बाईंदेवी व्यास पुरस्कार ■ रोटरी क्लब ऑफ बार्शीच्या वतीने २०११ सालचा लेखनक्षेत्रातील योगदानाबद्दल व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार ■ 'पानगळ' या कथासंग्रहाला नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाचा प्रतिष्ठेचा पु. ना. पंडित पुरस्कार ■ साहित्यदीप प्रतिष्ठान, पुणेच्या वतीने साहित्य सेवेबद्दल साहित्यदीप पुरस्कार ■ महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर शाखा आणि प्रिसिजन फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्यिक पुरस्कार हस्ते-ॲड. उज्वल निकम

**विशेष सन्मान** – ■ जून २०११ मध्ये फलटण येथे झालेल्या आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या पहिल्या प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ■ एप्रिल २०१२ मध्ये पणुंब्रे (सांगली) येथे झालेल्या ६ व्या डोंगरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ■ एप्रिल २०१३ मध्ये रेणावी (जि. सांगली) येथे झालेल्या १४ व्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ■ जानेवारी २०१५ मध्ये पुणे येथे झालेल्या पहिल्या अखिल भारतीय जाणीव साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

**संस्थात्मक कार्य** – ■ अध्यक्ष, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती समिती, पुणे ■ सदस्य, लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र शासन ■ माजी प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.



प्रमुख कार्यवाह या पदासाठी

**प्रकाश पायगुडे**

२०१ ए, लालबाग सोसायटी, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७

**भ्रमणध्वनी:** ९४२२० १२०२४, ९८५०० ८४७४४

**ई-मेल:** prakashpaigude@hotmail.com

**शिक्षण** : अभियांत्रिकी पदविका

**पत्रकारिता** : विविध वृत्तपत्रांमधून क्रीडाविषयक विपुल लेखन, स्तंभलेखन, मुलाखती

**आकाशवाणी** : आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा समालोचन, गेल्या तीस वर्षांत सुमारे शंभर कार्यक्रम.

**दूरदर्शन** : 'क्रीडांगण', 'खेळीयाड' असे सुमारे पाचशे कार्यक्रम सादर

**सूत्रसंचालन** : राष्ट्रीय कार्यक्रमांचे यशस्वी सूत्रसंचालन. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यपाल यांच्या कार्यक्रमांचे तसेच महाराष्ट्रातील प्रतिष्ठित कार्यक्रमांचे सूत्रसंचालन

**निवेदन** : मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत शास्त्रीय, सुगम संगीत कार्यक्रमांचे प्रभावी निवेदन.

**सांस्कृतिक/साहित्यिक** : 'सृजन फाऊंडेशन' या संस्थेचा संस्थापक, अध्यक्ष

**प्रमुख कार्यवाह:** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

**कार्यवाह:** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

**कार्यवाह** : ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. महाराष्ट्र राज्य नाट्य समीक्षक मेळावा. 'ज्योत्स्ना भोळे स्वरोत्सव' (गेली काही वर्षे आयोजन). सुवर्णमयी मराठी नाट्य संमेलनाचे यशस्वी आयोजन. 'पुणे की आशा' कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन. विविध संस्थांवर पदाधिकारी.

**प्रवास** : ■ क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांनिमित्त देशभर दौरा. 'क्रीडा-वैद्यकशास्त्र' आंतरराष्ट्रीय परिषद, सिंगापूर. 'फेस्टिव्हल ऑफ इंडिया' कार्यक्रम समन्वयक-रशिया ■ सांस्कृतिक देवाणघेवाण-फ्रान्स व इतर १२ युरोपीय देश.

**पुरस्कार:** ■ माध्यमरत्न पुरस्कार. (लोकमान्य टिळक ट्रस्ट व मराठी भाषा संवर्धन संस्था) ■ आचार्य अत्रे पत्रकारिता पुरस्कार (अत्रे प्रतिष्ठान, सासवड) ■ क्रीडा गौरव पुरस्कार (पुणे जिल्हा ॲथ. असो.) ■ साहित्य महामंडळाच्या 'अक्षरयात्रा'चे तीन वर्षे संपादन. ■ मसाप पत्रिकेचे प्रकाशक ■ रोटरी साहित्य संमेलनाचे नेटके आणि यशस्वी आयोजन. ■ वृत्तपत्रात स्तंभलेखन. ■ 'साहित्यवारी घुमानद्वारी' हे पुस्तक प्रकाशित.



कोषाध्यक्ष या पदासाठी

**सुनिताराजे किसन पवार**

संस्कृती प्रकाशन, ६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे ३०

भ्रमणध्वनी: ९८२३० ६८२९२

ई-मेल: sanskrutiprakashan@yahoo.com

**कार्यवाह** : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (२०११-१५)

**प्रकाशक** : संस्कृती प्रकाशन, पुणे

**संपादक** : संस्कृती दिवाळी अंक

**कार्यकारिणी सदस्य** : मराठी प्रकाशक परिषद

**अध्यक्ष** : राजमाता जिजाऊ नागरी पतसंस्था, पुणे

**अध्यक्ष** : संस्कृती ग्रंथालय, आळंदी, पुणे

**संचालक** : चौंडेश्वरी शिक्षण संस्था, रहिमतपूर

पुरस्कार ■ शांता शेळके प्रतिष्ठानचा 'साहित्यगौरव पुरस्कार' २०१३ ■ अश्वमेध ग्रंथालय, साताराचा 'अक्षरगौरव पुरस्कार' २०१३ ■ 'शिवगौरव पुरस्कार', पुणे २००८ ■ 'तेजस्विनी पुरस्कार', पुणे २०१५ ■ महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २०१० ■ २०११ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्थानिक कार्यवाह. ■ मूळ गाव पुसेगाव ता. खटाव, जि. सातारा. ग्रामीण पार्श्वभूमी, राज्य सेवेच्या परीक्षेत निवड झालेली असताना ती डावलून साहित्य क्षेत्रात रुची असल्याने प्रकाशनासारखं आव्हानात्मक क्षेत्र स्वीकारून २००२ साली 'संस्कृती प्रकाशन' हा भव्य मनोरा उभा केला. त्यात यशस्वी वाटचाल. २५० च्यावर पुस्तके प्रकाशित. अनेक नामांकित लेखकांसह नव्या लेखकांना प्रोत्साहन. अप्पा बळवंत चौक या साहित्य पंढरीत भव्य ग्रंथदालन. संस्कृती प्रकाशनच्या पुस्तकांना महाराष्ट्र शासन, मसाप, लोकमत असे महाराष्ट्रातील पुरस्कार प्राप्त. ■ 'संस्कृती' या दिवाळी अंकाचे आठ वर्षे संपादन. दिवाळी अंकाला मानाचे अनेक पुरस्कार मिळाले. अनेक दिवाळी अंकातून स्वतःचे लेखन आणि व्याख्याने. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजावी या हेतूने संस्कृती रथाची बांधणी, त्याद्वारे खेड्यापाड्यात, यात्रेत ग्रंथप्रदर्शनाचा अनोखा यशस्वी प्रयत्न, महाराष्ट्रात विविध ठिकाणी भव्य ग्रंथप्रदर्शने. ■ अनेक सामाजिक उपक्रमात सहभाग. आळंदीमध्ये आश्रम स्थापन करून ७० मुलांची निवास व भोजनाची सोय. ■ संस्कृती प्रकाशनतर्फे 'संस्कृती वाङ्मयसेवा' आणि 'संस्कृती वाचन संस्कार' या पुरस्कारांचे वितरण. ■ गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या सातारा ग्रंथ महोत्सवाच्या संयोजनात महत्त्वपूर्ण सहभाग. ■ संस्कृती प्रकाशनाने आजवर आर. आर. पाटील, रामचंद्र देखणे, प्रा. मिलिंद जोशी, प्रा. द. ता. भोसले, र. वा. दिघे, प्र. चिं. शेजवलकर, रा. र. बोराडे, प्रा. व. बा. बोधे, रमेश मुधोळकर, प्रा. व. के. पाटील, डॉ. यशवंत पाटणे, मंदा खांडगे, डॉ. राजेंद्र माने, प्रा. प्रदीप पाटील, जगदीश खेबूडकर, मधू कांबीकर, प्रा. विश्वास वसेकर, रॉय किणीकर, विश्वास गुसे, सुरेश पाटोळे अशा नामवंतांची पुस्तके प्रकाशित केली.



**स्थानिक कार्यवाह क्र. १ या पदासाठी**

(वर्षभरातील व्याख्याने, स्मृतिदिन इ. कार्यक्रम)

**ज्योत्स्ना हंसराज चांदगुडे**

९३/१, प्राप्ती निवास, दुधाणे वस्ती, एनडीए रोड, शिवणे, पुणे ४११ ०२३

भ्रमणध्वनी: ७३८५४ ९६६७३, ९८५०७ ३१९३९

**ई-मेल:** jyotsnachandgudejc@gmail.com

**शिक्षण** : एम. ए. एम. फिल

**प्रकाशित साहित्य** – ■ काव्यसंग्रह : तेजस्वला, जीवनमृत्यू, क्षण मोहरते, ती, ती आणि ती – तीन कवयित्रींचा काव्यसंग्रह. ■ अब्राहन लिंकन (बालचरित्र) ■ सेवेचे फळ (बाल एकांकिका संग्रह) ■ चिरंजीवी सप्तक (बाल एकांकिका संग्रह) ■ आम्ही रेसचे घोडे (बाल एकांकिका संग्रह) ■ सुलभ व्याकरण (शैक्षणिक) ■ मैत्रपंचमी – काव्यप्रवास – आत्मनिवेदनात्मक ५ मैत्रिणींचे आत्मकथन.

**संस्थात्मक कार्य** – **अध्यक्ष** : साहित्यदीप प्रतिष्ठान, पुणे माजी अध्यक्ष : काव्यशिल्प, पुणे **सचिव** : प्रेरणा आर्ट फाऊंडेशन, पुणे **संपादक** : साहित्यदीप दिवाळी अंक

**इतर** – अनेक कविसंमेलनात सहभाग, सूत्रसंचालक, अनेक मासिकांतून लेखन, आकाशवाणी, दूरदर्शन मालिकातून कवितांचे सादरीकरण, साहित्य संस्कृती मंडळाची परीक्षक म्हणून दोनदा निमंत्रित.

**पुरस्कार**– ■ पुणे जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षिका पुरस्कार ■मुख्याध्यापक संघातर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार ■ चंद्रशेखर मोरे तर्फे कै. हरिभाऊ मोरे स्मृती आदर्श शिक्षिका पुरस्कार ■ 'सेवेचे फळ' एकांकिका संग्रहास उत्कृष्ट बालवाङ्मय निर्मितीचा राज्यशासनाचा पुरस्कार (१९९६-९७) ■ 'तेजस्वला' या काव्यसंग्रहास अकोला साहित्य संघाचा भाऊसाहेब काकडे पुरस्कार ■ आपटे वाचनालय इचलकरंजीचा लक्षणीय कवितासंग्रह पुरस्कार ■ एकूण काव्य कारकिर्दीसाठी काव्यसप्ताह पुरस्कृत 'शांता-गोविंद' पुरस्कार. ■ साहित्य सेवा संघ पारगाव – शब्दालंकार पुरस्कार ■ शिवणे ग्रामपंचायतीचा नाट्यलेखिका पुरस्कार ■ रंगत संगत प्रतिष्ठानचा काव्य प्रतिभा पुरस्कार. ■ विवेकानंद प्रतिष्ठानचा काव्यगौरव पुरस्कार.

महाराष्ट्र साहित्य परिषद

परिवर्तन आघाडी



स्थानिक कार्यवाह क्र. २ या पदासाठी (समारंभपूर्वक पारितोषिके द्यावयाचे कार्यक्रम व त्या-त्या वर्षातील विशेष कार्यक्रम)

**नीलिमा बोरवणकर**

पत्ता ११, मधुबन 'बी' अपार्टमेंट, ताथवडे उद्यानाजवळ, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२
**दूरध्वनी** – ०२० २५४४२११८
**भ्रमणध्वनी** – ९८२२५ ५६२५१
**ई-मेल:** borwankar.neelima@gmail.com

**शिक्षण :** बी. एस. सी. होम सायन्स, रशियन भाषेची पदविका.

**व्यवसाय :** 'स्त्री', 'किर्लोस्कर' आणि 'मिळून साऱ्याजणी' मासिकात संपादकीय कामाचा अनुभव.

**लेखन :** मासिके, साप्ताहिके, वार्षिकात जवळपास ५० कथा प्रसिद्ध, १५० हून अधिक मुलाखती, अनेक मुखपृष्ठ कथा, सदर लेखन, आकाशवाणी, बालचित्रवाणीसाठी लेखन आणि सादरीकरण, जी. एन. जोशी यांच्यावरील माहितीपटाचे लेखन, जाहिरातींसाठी लेखन. प्रकाशित साहित्य: ■ स्वत:विषयी (विविध क्षेत्रातील २२ मान्यवरांच्या मुलाखती) ■ पंचतारांकित दुनियेत (पंचतारांकित हॉटेलच्या अंतरंगाचे चित्रण) ■ रंगभान (कथासंग्रह) ■ कार्डीओग्राम (कादंबरी) ■ आम्ही मायदेशी, मुले दूरदेशी (पालकांच्या अंतरंगाचा वेध) ■ भवताल (कथासंग्रह) ■ निजखूण (कादंबरी) ■ झळाळ (कथासंग्रह) ■ गाज (कादंबरी) ■ ४ कथांचे इंग्रजीमध्ये व ७ कथांचे हिंदीत अनुवाद झाले आहेत.

**पारितोषिके –** ■ दिल्ली येथील कथा संस्थेचे पोरितोषिक २००४ ■ 'रंगभान' या कथासंग्रहाला राज्य शासनाचा ग. ल. ठोकळ पुरस्कार २००८ ■ सार्वजनिक वाचनालय नाशिक यांचा कथालेखनासाठी डॉ. अ. वा. वर्टी पुरस्कार २०१३ ■ पुणे मराठी ग्रंथालय यांचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार २०१३ ■ 'भवताल' कथासंग्रहाला पुणे नगर वाचन मंदिराचा श्री. ज. जोशी पुरस्कार २०१४ ■ 'झळाळ'ला म.सा.प. चा दि. बा. मोकाशी पुरस्कार २०१४ **इतर–** ■ अनेक कार्यक्रमांचे निवेदन-सूत्रसंचालन. झी. मराठी, ई टीव्ही साठी मुलाखती, 'आठवणीतल्या मुलाखती' हा कार्यक्रम अनेक शहरात सादर. ■ बेळगाव, इंदूर, वास्को(गोवा), फोंडा(गोवा) येथील महिला साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद. विविध व्यासपीठांवर तसेच राज्यस्तरीय लेखिका संमेलन (नागपूर, कोल्हापूर) येथे मान्यवरांच्या प्रकट मुलाखती.



बिनविरोध निवड
स्थानिक कार्यवाह क्र. ५ या पदासाठी (ग्रंथालय विभाग)

**वि. दा. पिंगळे**

स्वामी संकुल, बी विंग, फ्लॅट नं. ३०१, चौथा मजला, तलाठी कार्यालयाजवळ, शिवणे, पुणे ४११ ०५२
**भ्रमणध्वनी:** ९८८१२ ३५०३३
**ई-मेल:** vidapingle@gmail.com

**शिक्षण:** एम. ए. बी. एड., एम. ए. बी. जे.

प्रकाशित पुस्तके – ■ विरह (काव्यसंग्रह) ■ झोपडीतला जीव (काव्यसंग्रह) ■ मन (काव्यसंग्रह) (२ आवृत्त्या) ■ गावशिव (काव्यसंग्रह) (२ आवृत्त्या) ■ ऊन-सावल्या (काव्यसंग्रह) ■ निसटते क्षण (काव्यसंग्रह) ■ सुविचार सरिता – स्वलिखित सुविचार पुस्तिका (३ आवृत्त्या) ■ अमृतसागर पसायदान (६ आवृत्त्या) ■ कर्मयोगी संत गाडगेबाबा (३ आवृत्त्या) ■ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे (३ आवृत्त्या) ■ मानवतेचे कैवारी मामासाहेब मोहोळ ■ युगप्रवर्तक महात्मा जोतिबा फुले (२ आवृत्त्या) ■ महाराष्ट्राची आई साने गुरुजी (२ आवृत्त्या) ■ पिंगळेज इंग्लिश ग्रामर बुक इ. ८ वी ते १२ वी (८ आवृत्त्या) ■ क्रांतिगुरु लहुजी वस्ताद (३ आवृत्त्या) ■ प्रेरणास्रोत मराठी उद्योजक – भाग – १ (२ आवृत्त्या) ■ प्रेरणास्रोत मराठी उद्योजक – भाग – २ (२ आवृत्त्या) ■ प्रेरणास्रोत मराठी **उद्योजक** – भाग – ३

**पुरस्कार–** ■ खान्देश सायली काव्य पुरस्कार २००२ ■ महाराष्ट्र शासन उत्कृष्ट बालवाङ्मय निर्मिती पुरस्कार २००३-०४ (लोकशाहीर अण्णा भाऊ साठे या पुस्तकास) ■ खान्देश मराठी बालकुमार साहित्य प्रतिष्ठानतर्फे या दशकातील सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय चरित्र वाङ्मय पुरस्कार ■ पुणे महानगरपालिकेकडून साहित्य व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्याबद्दल सन्मान २००६ ■ लोककल्याण साहित्यरत्न भूषण पुरस्कार, पुणे २००८ ■ साहित्यवेल पुरस्कार, चाळीसगाव २००८ ■ सिंहगड भूषण पुरस्कार, पुणे २०१० ■ आदर्श शिक्षक पुरस्कार, ५ सप्टेंबर २०१० ■ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार, पुणे २०१३ ■ राज्यस्तरीय बालकवी काव्य पुरस्कार २०१४, धरणगाव, जि. जळगाव ■ गदिमा काव्य पुरस्कार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पिंपरी चिंचवड पुणे ■ मानवाधिकार गौरव पुरस्कार – २०१४ मानवाधिकार असोसिएशन, पिंपरी-चिंचवड, पुणे अभ्यासक्रमात समावेश ■ सुलभभारती (मराठी) इयत्ता सातवी पाठ्यपुस्तकात 'लहुजी वस्ताद' पाठाचा समावेश. ■ सचिव साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान कोथरूड, १५ संमेलनांचे यशस्वी आयोजन.



स्थानिक कार्यवाह क्र. ६ या पदासाठी (अतिथी निवास व्यवस्थापन, वास्तुदेखभाल)

**घनश्याम पाटील**

'चपराक प्रकाशन', ६१७, शुक्रवार पेठ, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, पुणे ४११ ००२
**दूरध्वनी:** ०२०-२४४६ ०९०९
**भ्रमणध्वनी:** ७०५७२ ९२०९२
**ई-मेल:** ghanshyam@chaprak.com

■ **व्यवसाय :** पत्रकारिता/ पुस्तक प्रकाशन

■ गेली १५ वर्षे पूर्ण वेळ पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत. साप्ताहिक 'चपराक' आणि मासिक 'साहित्य चपराक'चे मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक. 'चपराक प्रकाशन' या प्रकाशन संस्थेचे प्रकाशक, संचालक. महाराष्ट्रातील सर्वात कमी वयाचा स्वतंत्र संपादक. ■ अनेक वाङ्मयीन व वैचारिक नियतकालिकातून सातत्याने लेखन; तसेच अनेक ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. 'साहित्य चपराक'च्या दिवाळी अंकाला अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त. यंदा (२०१५) तब्बल ४६८ पृष्ठसंख्येचा आणि जवळपास १५० साहित्यिकांचा सहभाग असलेला 'साहित्य चपराक'चा विक्रमी दिवाळी महाविशेषांक प्रकाशित केला. 'दखलपात्र' आणि 'झुळूक आणि झळा' हे अग्रलेखांचे दोन संग्रह प्रकाशित. 'दखलपात्र'च्या दोन आवृत्त्या प्रकाशित झाल्या. कथा, कविता, ललित आणि वैचारिक लेखन. ■ 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून आजवर कथा, कविता, ललित, वैचारिक, अध्यात्म, चरित्र, आत्मचरित्र, बालसाहित्य आणि स्पर्धा परीक्षांची पुस्तके प्रकाशित. दरवर्षी 'चपराक साहित्य महोत्सवा'चे आयोजन. राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन. साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय विषयांवर सातत्याने घेतलेल्या ठाम भूमिका लक्ष्यवेधी ठरल्या.



स्थानिक कार्यवाह क्र. ३ या पदासाठी (वार्षिक ग्रंथनिवड (वार्षिक ग्रंथ पारितोषिकांसाठी))

**स्वप्निल पोरे**

शांतीबन, सर्व्हे १४/१५/१ अ, आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०५१
**दूरध्वनी** – ०२०-२४३४६४९३
**भ्रमणध्वनी:** ९४२२० २९०४१
ई-मेल: swapniielspore@gmail.com

■ 'केसरी'चे पत्रकार आणि लेखक-कवी ही स्वप्निल पोरे यांची ओळख आहे. 'दूर कोई गाए', 'न्हिदमकिंग ओ. पी. नय्यर' आणि 'प्राण' ही त्यांची पुस्तके वाचकप्रिय ठरली. 'दूर कोई गाए' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, महाराष्ट्र साहित्य परिषद, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन यांसह अनेक महत्त्वाच्या व्यासपीठांवर त्यांनी कविता सादर केल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रतिष्ठित मासिकांमध्ये, नियतकालिकांमध्ये त्यांच्या अनेक कथा-कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. ■ 'केसरी'त साहित्य, संगीत आणि कला या विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले. प्रतिभावान मराठी व हिंदी साहित्यिक, गीतकार, गायक-गायिका, संगीतकार यांच्या त्यांनी घेतलेल्या मुलाखती वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या. एम. ए. इकॉनॉमिक्स (पुणे विद्यापीठ), मास्टर ऑफ जर्नालिझम (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ) असे स्वप्निल पोरे यांचे शिक्षण असून गेली २५ वर्षे पत्रकारितेच्या क्षेत्रात आहेत. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या पुणे केंद्राचे ते समन्वयक आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने, सूर्यदत्ता स्कूल ऑफ कम्युनिकेशन स्टडिजतर्फे स्वामी विवेकानंद पत्रकारिता सन्मानाने त्यांना गौरविण्यात आले. काव्यशिल्प संस्थेचा 'काव्यमित्र' पुरस्कार त्यांना मिळाला आहे. 'न्हिदमकिंग ओ. पी. नय्यर' या पुस्तकासाठी त्यांना राज्यस्तरीय गोविंदराव आदिक साहित्य पुरस्कार तसेच चित्रपट साहित्य गौरव पुरस्कार मिळाला.



सर्वसाधारण प्रतिनिधी पुणे शहर या पदासाठी

**नंदा सुर्वे**

बी २/१०५, लक्ष्मीगंगा रेसिडेन्सी, सर्व्हे नं. ६/२, वडगाव बुद्रुक सनसिटीजवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे ४११ ०५१
**भ्रमणध्वनी:** ९४२३५ ३३२४०

■ सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, केसरी अशा काही वृत्तपत्रांमधून प्रासंगिक लेख, परिचय लेख, वार्तांकन, ललितलेख, ग्रंथसमीक्षा, अनुभवसाक्षी विपुल लेखन. ■ काही निवडक मासिके, नियतकालिके, अनियतकालिके, दिवाळी अंक, स्मरणिका यामधूनही परिचय लेख, कथा लेखन, संकलनपर लेखन व शब्दांकन. ■ साप्ताहिक 'सकाळ' मध्ये 'गप्पाटप्पा' या सदरासाठी दीर्घकाळ लेखन. ■ पुणे आकाशवाणीवर नाट्यरूपांतर, संवादलेखन, मालिका लेखन, पुस्तक परिचय व मुलाखती. ■ 'स्मरणस्वर' हे भावगीत गायकांच्या परिचयाचं पुस्तक. ('सकाळ' या दैनिकातील लेखांचे संकलन.) या पुस्तकाला भगिनी निवेदिता प्रतिष्ठानचा 'शारदाबाई आपटे साहित्य पुरस्कार' प्राप्त. ■ 'चौकटीच्या आतबाहेर' हा कथासंग्रह व 'पाने उलटताना' हा ललितलेख संग्रह प्रकाशित. ■ विविध ग्रंथपुरस्कार समित्यांवर परीक्षक म्हणून काम. ■ महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विद्यमान कार्यवाह. ■ राज्य शासनाच्या ग्रंथनिवड समितीवर सदस्य म्हणून काम. ■ अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर सदस्य म्हणून निवड.



सर्वसाधारण प्रतिनिधी पुणे शहर या पदासाठी

**प्रा. क्षितिज पाटुकले**

६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४
भ्रमणध्वनी: ९८२२८ ४६९१८
ई-मेल: patukalesir@gmail.com

जीवन हा सतत शिकण्याचा प्रवास आहे, प्रयत्न हाच परमेश्वर, नि:स्वार्थ हाच खरा स्वार्थ आणि जीवनाचा विनम्र उपासक अशी भूमिका घेऊन जगणारे बहुआयामी आणि बहुपेडी व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. क्षितिज पाटुकले. लेखक, व्याख्याता, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक, चिंतक, साधक, देशभक्त, गोभक्त, कृतिशील कार्यकर्ता इ. विविध प्रकारे ते कार्यरत आहेत. इन्श्युरन्स ॲकॅडमी या संस्थेचे ते संस्थापक संचालक आहेत. इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर, एम.एम.एस., एल.एल.बी., फेलो ऑफ इन्श्युरन्स इन्स्टिट्युट, पीएचडी स्कॉलर, योग आणि आयुर्वेदिक पदविका, जी.डी.सी. ॲंड ए., राष्ट्रभाषा पंडित इ. अनेक विषयांमध्ये त्यांनी शैक्षणिक पदव्या प्राप्त केल्या आहेत. भारतातील विविध विद्यापीठांसाठी अभ्यासक्रम तयार केले आहेत. विविध प्रकारच्या शैक्षणिक, उद्योजकीय आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आहे. ■ लेखक म्हणून विमा, बँकिंग, रिटायरमेंट, वैद्यकीय मदत याविषयी पुस्तके विविध भाषांमध्ये प्रकाशित झाली आहेत. साहित्य क्षेत्रामध्ये त्यांनी 'साहित्य सेतू' या संस्थेची स्थापना करून लेखक आणि वाचकांसाठी कार्यशाळा घेतल्या आहेत. त्यांची आतापर्यंत १० पुस्तके प्रकाशित झाली असून ती विविध भाषांमध्ये प्रकाशित झाली आहेत.

**प्रकाशित पुस्तके** ■ कर्दळीवन: एक अनुभूती – हिंदी, इंग्रजी, कन्नड, गुजराती, संस्कृत, तेलगू, तमिळ भाषेत अनुवादित. तसेच ब्रेल लिपी, ई-बुक, मोबाईल बुक आणि ऑडिओ बुक प्रकाशित. ■ विम्याविषयी सर्व काही – मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, गुजराती भाषेत अनुवादित ■ तरुणपणीच करा रिटायरमेंट प्लॅनिंग – मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत अनुवादित ■ मेडिक्लेम आणि हेल्थ इन्श्युरन्स-मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत अनुवादीत ■ वैद्यकीय मदत कशी मिळवावी – मराठी ■ श्री दत्त परिक्रमा-मराठी ■ कर्दळीवन संजीवनी (संपादित) – मराठी ■ पेन्शन आता प्रत्येकाला-मराठी ■ उत्तरावाहिनी नर्मदा परिक्रमा – मराठी ■ नक्षत्रवृक्ष : उपासनेकडून पर्यावरण संतुलनाकडे – मराठी



सर्वसाधारण प्रतिनिधी पुणे शहर या पदासाठी

**ॲड. श्रीधर लिंबाजी कसबेकर**

स. नं. ३५/३/७, धनकवडी, गुरुदत्त कृपा गृहनिर्माण संस्था, फ्लॅट नं. बी/२३, मोहननगर, पुणे ४११ ०४३ **भ्रमणध्वनी** – ९८२२० २६६५९, ९८८१८ ३९१३७

■ शिक्षण – बी. कॉम., एल. एल. बी., डी. एल. एल. आणि एल. डब्ल्यू. ■ व्यवसाय – वकिली व्यवसाय १९८४ पासून नोटरी – महाराष्ट्र शासनातर्फे सन १९९८ साली नोटरी म्हणून नियुक्ती. ■ समाजकार्याच्या माध्यमातून महाराष्ट्रभर विविध स्वरूपाचे दौरे केले आहेत. ■ व्याख्याता – सामाजिक, आर्थिक व इतर विविध विषयावर व्याख्याने दिली आहेत. ■ सामाजिक कार्य – क्रांतिगुरू लहुजी साळवी सामाजिक प्रतिष्ठान व राष्ट्रीय कृषी विविध विकास संशोधन फेडरेशन या संस्थेच्या माध्यमातून गेल्या ३५ वर्षांपासून समाजामध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. ■ महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्थांवर सल्लागार म्हणून कार्यरत आहे. प्रकाशित साहित्य–■ 'माझी माय' (माझे आत्मचरित्र) ■ या पुस्तकाला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्य पुरस्कार.

# आरसा






***आरसा*** माणसाच्या जीवनातील अविभाज्य घटक. प्रत्येकजण दिवसाला एकदा तरी, कमीतकमी... आरसा पाहतोच. स्त्रिया आणि आरसा यावर तर खूप विनोदही आहेत. काहींच्या मते स्त्रियांच्या जीवनात आरशाला खूप महत्त्व असतं. स्त्रियाही नटल्यावर प्रथम आरशासमोर उभं राहून त्यालाच सवाल करतात, 'सांग दर्पणा कशी मी दिसते.' काही जण तर म्हणतात स्त्रियांना छळायचं (प्रेमाने) असेल, त्यांना शिक्षा द्यायची झाली तर त्यांना छान सजण्यास, नटण्यास सांगावं आणि त्यांचा सगळा साजशृंगार झाला की आरसा लपवून ठेवावा! हा विनोदाचा भाग झाला. हल्ली काही पुरुषही मेकअप वगैरे करतात. एकंदरीत काय तर आरसा हा हवाच! आपली प्रतिमा कशी दिसते हे पाहण्यासाठी प्रत्येकजणच उत्सूक असतो.

आजकाल स्त्रियांनाच आरसा हवा असतो असे नाही. हल्ली सगळ्यांनाच आरसा हवा असतो. आपण रस्त्यावर स्कूटर लावली की आपल्या कामाला निघून जातो आणि आपले काम आटोपून परत आले की लक्षात येतं की गाडीचे आरसे वाकडे तिकडे झालेले आहेत. आमच्या इथे जवळच कॉलेज आहे. कॉलेजची मुलं कोणाच्याही गाडीवर बसतात. आरसे वाकडे-तिकडे करून भांग पाडतात तर काही चेहरा कधी डावीकडे तर कधी उजवीकडे करत आरसा पाहत असतात.

सर्वसाधारण आरशामध्ये आपण आहोत तशीच आपल्याला प्रतिमा दिसते तर काही आरशांमध्ये आपण पाहिलं की आपल्याला आपण आहोत त्यापेक्षा खूप वेगळी प्रतिमा दिसते. आपण आहे त्यापेक्षा जाड वा आहे त्यापेक्षाही बारीक दिसतो. क्षणिक बारीक पाहून आनंदही होतो पण असे आरसे आपण घरी लावत नाही. असले आरसे प्रदर्शनातच बरे वाटतात. आपण जसे नाही तसे एकदाच केव्हातरी पहायला बरं वाटतं. नेहमी तसं पहायला आवडणार नाही.

आरशावरून आपल्याकडे अनेक म्हणी, वाक्प्रचारही प्रचलीत आहेत. उदाहरणार्थ 'हातच्या कांकणाला आरसा कशाला?', 'आरसा दाखवणे' इत्यादी. त्याचप्रमाणे अनेक गाणी ही आहेत, 'मी कशाला आरशात पाहू गं... मीच माझ्या रूपाची राणी गं', हिंदीतील 'दर्पण छूट ना बोले, चाहे सोने के फ्रेम रखलो, आईना छूट नही बोलता...'

एखादा दिवस वाईट गेला की आपण पटकन म्हणतो, ''आज कोणाचं तोंड पाहिलं कोणास ठाऊक, सगळा दिवस खराब गेला. एक काम धड झालं नाही.'' मग आपले हितचिंतक मित्र गमतीने, मिश्किलपणे म्हणतात, ''अरे आरसा बघितला असशील उठल्या उठल्या!'' आणि आपल्याला वास्तवाची जाणीव करून देतात.

आता आरसे आहेत पण ज्याकाळी आरसे नव्हते त्याकाळी पाण्यामध्ये आपलं प्रतिबिंब पाहिलं जायचं असं म्हणतात. प्रतिबिंब पाहताना कोणीतरी पाण्यात खडा टाकला की प्रतिमा विस्कळीत वेडीवाकडी होत, दिसेनाशी होत जाते. एकूण काय आपण कसे दिसतो, ती बाह्य प्रतिमा कशी आहे हे जाणून घ्यायला सर्वांनाच आवडतं!

चेहरा हा व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे असंही म्हटलं जातं. आरशात आपलं रूप, ठेवण याची प्रतिमा उमटते, आरसा कधी खोटं बोलत नाही. आपल्याला आवडो किंवा नावडो, आपले जसे रूप आहे तसेच त्यामध्ये दिसते. तशीच आपली समाजात एक प्रतिमा उमटत असते आणि समाजात विशिष्ट अशी प्रतिमा निर्माण व्हायला आयुष्यही खर्ची पडतं. आरशासमोर उभं राहिलं की लगेच प्रतिमा दिसते, तसं समाजातल्या आपल्या प्रतिमेबाबत होत नाही. आपली वागणूक, सदाचार, माणूस म्हणून आपण कसे आहोत, आपल्या स्वभावाच्या चांगल्या-वाईट बाजू हे विविध प्रसंगाने प्रकट होत जातात आणि समाजात आपली प्रतिमा निर्माण होते. जोवर सदाचार, माणुसकी सारख्या गुणांना आपण महत्त्व देऊन त्याप्रमाणे वागतो तोवर आपली प्रतिमा चांगली दिसत राहते; पण जेव्हा आपण बोलतो एक आणि करतो एक तेव्हा आपली वेगळी प्रतिमा तयार होते. त्यामुळे समाजातली प्रतिमा निर्माण करणं हे आपल्या वर्तणुकीवर अवलंबून असतं. त्यामुळेच एखाद्याची खूप चांगली वर्तणूक असेल आणि त्याने काही वाईट कृत्य केले तर आपण त्याच्या प्रतिमेला तडा गेला असे म्हणतो.

कधीतरी आरसा पाहताना असं लक्षात येतं की आरशामध्ये आपल्याला आपली प्रतिमा स्पष्ट दिसत नाही म्हणून आपण आरसा साफ करतो. तरीही नीट दिसत नाही मग बारकाईने पाहिल्यावर लक्षात येतं की आरशाच्या मागचा पारा निघाल्याने केवळ काच राहिली आहे. नंतर हळूहळू आरशाच्या मागचा सगळाच पारा निघून जातो आणि शिल्लक राहते ती केवळ काचच! आरशाचं अस्तित्व नष्ट होतं. आपली प्रतिमा त्यात मग आपण पाहू शकत नाही. असंच आपल्या सामाजिक प्रतिमेचं असतं. आपल्याला आपल्या वर्तणुकीमुळे पाऱ्यासारखे काही गुण चिकटवले जातात. आपलं जसं व्यक्तिमत्त्व असतं तशी आपली सामजात चांगली वाईट प्रतिमा तयार होते पण कळत नकळत आपल्या वागणुकीने चांगल्या गुणांशी फारकत घेतली तर आपली अवस्था पारा गेलेल्या आरशासारखी होऊन जाते. त्यामुळे आपल्याला आपलं आत्मपरिक्षण करायला हवं नाहीतर शायर मोहसीन प्रमाणे म्हणावं लागेल,

'बस एक ही गलती हम सारी जिंदगी करते रहे मोहसीन
धुल चेहरे पर थी और हम आईना साफ करते रहे' ■

# महाराष्ट्र साहित्य परिषद परिवर्तन आघाडीचे उमेदवार



पुणे जिल्हा प्रतिनिधी या पदासाठी
**राजन लाखे**
एफ-६, गिरीराज विहार, बिजली नगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३
भ्रमणध्वनी: ९८९२६ ५५५२६, ९६३७२ ७८४५१
ई-मेल: lrajan30@gmail.com

**शिक्षण** - बी. ई. मेकॅनिकल, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अमरावती, एम. ई. - व्ही. जे. टी. आय. मुंबई. एल. एल. बी. - भारती विद्यापीठ, पुणे

**सहभाग** - अनेक काव्यस्पर्धेत, काव्यवाचन व परिसंवादात सहभाग **प्रशस्तीपत्र** - २००२ मध्ये संपन्न झालेल्या अमृत महोत्सवी अखिल भारतीय साहित्य संमेलनात प्रशस्तीपत्र

पुरस्कार - ■ समता साहित्य परिषद, महाराष्ट्र गोवा तर्फे 'निर्भयनवती' व 'घाव' या काव्यास पुरस्कार (२००५) ■ संगमनेर येथे झालेल्या अखिल भारतीय नवोदित साहित्य पुरस्कार (२००८) ■ २००८ लोकनायक प्रल्हाद शिंदे पुरस्कार ■ २०११ साहित्यदीप पुरस्कार ■ साहित्य-लोकसत्ता, सकाळ, लोकमतमध्ये लेख प्रसिद्ध, कालनिर्णय, दामिनी, मशाल, पुष्पविकास, छंद, अपेक्षा, छेप, साहित्यदीप, कराडवैभव, संस्कृती, साहित्यरंग इत्यादी दिवाळीअंकात मासिकांमध्ये व संध्यानंद या वृत्तपत्रात काव्यप्रसिद्ध

**लेखन** - ■ २००५ मध्ये 'वास्तवरंग फुलताना' हा काव्यसंग्रह मुंबई येथे प्रकाशित ■ २०१० मध्ये 'मी पाहिलेला सूर्य' हा काव्यसंग्रह व 'मनातले माझ्या' हा चारोळीसंग्रह पुणे येथे प्रकाशित ■ **ध्वनीफित** -२००७ मध्ये टी-सिरीज निर्मित 'बहरला गुलमोहर' ही हृदयस्पर्शी भावगीतांची ध्वनीफित प्रकाशित. (संगीतकार - नंदू होनप) ■ २०११ मध्ये सुमितनिर्मित 'जगण्यात मजा आहे' ही सुरेल गीतांची ध्वनीफित प्रकाशित. (संगीतकार-यशवंत देव) कार्यक्रम - राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेच्या वाळवा, जि. सांगली येथे संपन्न झालेल्या सातव्या राष्ट्रीय बंधुता संमेलनातील कविसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान. ■ पहिले विश्व मराठी - फेब्रुवारी २००९ मध्ये अमेरिकेत कॅलिफोर्नियातील सॅन होजे येथे संपन्न झालेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनातील व्यासपीठावर 'मी मराठी' व 'परदेशी माती' या काव्याचे वाचन ■ मार्च २०११ - महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या कार्यकारिणित सदस्य म्हणून निवड ■ मार्च २०१२ - महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष म्हणून निवड ■ ऑगस्ट २०१२ - अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर 'विश्वस्त' म्हणून निवड ■ ऑगस्ट २०१३ - महाराष्ट्र साहित्य शाखा विटा जिल्हा सांगली येथील विभागीय साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून सहभाग ■ २०१४ - 'सौंदर्याच्या गर्भातून' व 'मन माझे मी मनाचा' ही दोन पुस्तके कवी मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते प्रकाशित. तसेच 'तरूणाईचे नवे तराणे' ही ध्वनीफित युनिव्हर्सल म्युझीक इंडियाद्वारे प्रकाशित ■ २०१५ - 'साहित्यिकांची आरोग्य तपासणी' हा मराठी साहित्य इतिहासात पहिला उपक्रम आयोजित करण्याचा मान.



पुणे जिल्हा प्रतिनिधी या पदासाठी
**प्रा. डॉ. पुरूषोत्तम दत्तात्रय काळे**
हरिओम कॉम्पलेक्स, मु. पो. घोडेगाव ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०८
भ्रमणध्वनी: ९४०४९३७७१०, ९४२१०१४२९०
ई-मेल: purushottamdkale@gmail.com

**शिक्षण** - बी. ए. एम. एस. (पुणे), एम. ए. (मराठी, पुणे विद्यापीठ), सेट-नेट (मराठी)

**व्यवसाय** - वैद्यकीय व अध्यापन इतर माहिती - ■ २००६ पासून महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या साहित्य संस्थेच्या कार्यकारिणीवर सलग दुसऱ्यांदा निवड ■ अखिल भारतीय साहित्य महामंडळाचा माजी सदस्य २०१२ ■ पहिले विश्व साहित्य संमेलन, अमेरिका आणि तिसरे विश्व मराठी साहित्य संमेलन सिंगापूर या संमेलनांना उपस्थिती आणि सहभाग. ■ लेखक, कवी, वक्ता, साहित्य, आरोग्य आणि प्रबोधनपर विविध विषयांवर व्याख्याने. ■ महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन या संस्थेवर शासननियुक्त सदस्य २००६ ते २०११ ■ बी. डी. काळे महाविद्यालय (पदवी आणि पदव्युत्तर), घोडेगाव येथे सहायक प्राध्यापक पदावर ऑगस्ट २०१४ पासून मराठी विभागात कार्यरत आहे. ■ न्या. रानडे वादविवाद स्पर्धा, पुणे आणि मविप्र करंडक वक्तृत्व स्पर्धा, नाशिक या आणि अशा अनेक स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून काम पाहिले. ■ शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात न्या. रानडे वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा, पुणे. मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा, बारामती या व अशा विविध वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये विजेतेपद ■ महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे या साहित्य संस्थेच्या 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर सदस्य २०१५ ■ मसाप घोडेगाव शाखेचे स्थापनेपासून अध्यक्ष.



पुणे जिल्हा प्रतिनिधी या पदासाठी
**रावसाहेब पवार**
सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे
भ्रमणध्वनी: ९८५०३९०७४०

■ मसाप शाखा सासवडचे स्थापनेपासून अध्यक्ष.
■ जानेवारी २०१४ मध्ये सासवड येथे झालेल्या ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनात सक्रिय सहभाग
■ मसाप शाखा सासवड व आचार्य अत्रे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी साहित्य संमेलनात सहभाग
■ विविध वृत्तपत्रातून व मासिकातून वैचारिक लेखन
■ विविध शाळा महाविद्यालयातून विविध सामाजिक, शैक्षणिक व साहित्य विषयक व्याख्याने
■ गेली ४५ वर्षे सामजिक व परिवर्तनवादी चळवळीत सहभाग

## 'चपराक'चे नवे प्रकाशन




आजच्या फळीतील ताकदीचे युवा लेखक, कवी **व्यंकटेश कल्याणकर** यांचा अप्रतिम आविष्कार!
मोजक्या शब्दात अफाट सामर्थ्य पेरणाऱ्या सारांश कथा अनुभवण्यासाठी हे पुस्तक अवश्य वाचा. मराठीतील हा आगळा-वेगळा प्रयोग आपणांस निश्चितच भावेल.
पुस्तकासाठी संपर्क: चपराक प्रकाशन, संपर्क: ०२०-२४४६ ०९०९
ऑनलाईन खरेदीसाठी भेट द्या: www.chaprak.com



## माझ्या आवडीची कविता

कवी - विंदा करंदीकर
रसिक - कीर्ती देसाई, चाकण
मो. ७२७६६ ९८७८०

### माझ्या मना बन दगड

हा रस्ता अटळ आहे !
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय
कुडकुडणारे हे जीव
पाहू नको, डोळे शिव!
नको पाहू जिणे भकास,
ऐन रात्री होतील भास
छातीमधे अडेल श्वास,
विसर यांना दाब कढ
माझ्या मना बन दगड!

हा रस्ता अटळ आहे !
ऐकू नको हा आक्रोश
तुझ्या गळ्याला पडेल शोष
कानांवरती हात धर
त्यातूनही येतील स्वर
म्हणून म्हणतो ओत शिसे
संभाळ, संभाळ, लागेल पिसे!
रडणाऱ्या रडशील किती?
झुरणाऱ्या झुरशील किती?
पिचणाऱ्या पिचशील किती?
ऐकू नको असला टाहो
माझ्या मना दगड हो!

हा रस्ता अटळ आहे !
येथेच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर
असतात नाचत काळोखात;
हसतात विचकून काळे दात
आणि म्हणतात, कर हिंमत
आत्मा विक उचल किंमत!
माणूस मिथ्या, सोने सत्य
स्मरा त्याला स्मरा नित्य!
भिशील ऐकून असले वेद
बन दगड नको खेद!

बन दगड आजपासून
काय अडेल तुझ्यावाचून
गालावरचे खारे पाणी
पिऊन काय जगेल कोणी?
काय तुझे हे निःश्वास
मरणाऱ्याला देतील श्वास?
आणिक दुःख छातीफोडे
देईल त्यांना सुख थोडे?
आहे तेवढे दुःखच फार
माझ्या मना कर विचार
कर विचार हास रगड
माझ्या मना बन दगड

हा रस्ता अटळ आहे !
अटळ आहे घाण सारी
अटळ आहे ही शिसारी
एक वेळ अशी येईल
घाणीचेच खत होईल
अन्यायाची सारी शिते
उठतील पुन्हा, होतील भुते
या सोन्याचे बनतील सूळ
सुळी जाईल सारे कूळ
ऐका टापा! ऐका आवाज!
लाल धूळ उडते आज
त्याच्यामागून येईल स्वार
या दगडावर लावील धार!
इतके यश तुला रगड
माझ्या मना बन दगड

## तराजू

❑ भालचंद्र कोळपकर, पुणे मो. ९९२२७ ६०१२५

आई आणि बायकोचे प्रेम
जसे एकाच तराजूत बसलेले
पण दोघींनाही वाटते
पारडे दुसरीकडे जास्त झुकलेले

ज्यांना ज्यांना पाळता येतो
अशा तराजूचा कायदा
त्यांना नक्की मिळत रहातो
दोन्ही प्रेमाचा फायदा

नाहीतर हासू ऐवजी आसू
वाहतात प्रत्येकाच्या गाली
अन् बुद्धिच्या बळाने चालतात
सर्वांच्याच तिरक्या चाली

चाली चालवण्यात खर्च होतो
प्रत्येकाच्या आयुष्याचा वेळ
त्याच धुंदीत कळत नाही
कधी झाला संसाराचा खेळ

त्या खेळासाठी तयारच असते
पोलीस आणि कोर्टाचे ग्राऊंड
मग घराच्या इज्जतीवर तेथे
बलात्काराचे राऊंडवर राऊंड

एकमेकांची जिरवता जिरवता
शेवटी घरच जिरत जाते
आपल्याच दुर्दैवी फेऱ्यात
सुंदर आयुष्य फिरत रहाते

म्हणून एक जन्म देणारी
तर दुसरी जन्माला साथ देणारी
एकीने बनवलेली नाव
दुसरीने न्यावी किनारी

आपल्या माणसाचे दोष
आपणच सहन केले पाहिजे
आणि सहनशिलतेच्या सरणावर
मतभेद दहन केले पाहिजे

## अपूर्ण कविता

जीर्ण झालेल्या
फाटक्या चिंध्यांच्या संसाराला
टाके घालता घालता...,
बोलली ती एक दिवस

या बेरंगी ठीगलांच्या जोडजाडीत
मी विसरलेय...
आयुष्याचा खरा रंग...

घर साफ करताना
घराच्या सांदी सांदी अन
कोपऱ्या कोपऱ्यातून निघतात..
तूम्ही जपत आलेली
कवितांची कागदं...

पिठाच्या डब्यातालं
जाळं तेव्हढं निघत नाही... अन...
छपराला पडलेली भोके
कवितांच्या कागदांनी
बुजत नाही...

वाटते कधी कधी...
कविता सवतीसारखी
थकलेल्या उधारीच्या
पावती सारखी...

यते चिड... होतो त्रागा
असा कसा हा
जगण्याचा धागा

कोणत्याच दुकानात
हा कवितेचा कागद
पैसा म्हणून घेत नाही
अन बाजाराच्या पिशवीत
कविता घरी घेऊन येता येत नाही...

तू शांतपणे...
घेतोस मिठीत मला
अन... म्हणतोस
सारा संसार शब्द माझे
अन... तूच माझी 'कविता'
अन घरभर पसरलेली
श्रीमंती जाणवते
कोपरऱ्या कोपऱ्यातली
कागदा कागदावरची
अपूर्ण कविता
पुर्नत्वासाठी खुणावत रहाते

**डॉ विशाल इंगोले** (सोसवी)
मो. ९९२२२ ८४०५५

## मायेची माया

लेक सासरला जाता,
येतं डोळ्यांमधी पाणी!
कंठी हुंदके मायेच्या,
बंद होते तिची वाणी!

हात फिरविती तोंडा,
असा मायेचा जिव्हाळा!
कसा देवाने लावला,
माय-लेकीमधी लळा!

तांब्या भरला घेऊनी,
माय बाहेर ती येते!
तिचे सुखलेले डोळे,
उर आपटुनी घेते!

लेक चालत चालत,
जशी दूर दूर जाते!
माय पाहती तोवरी,
तिचा ठिपका न होते!

माय लेकीचं रे नातं,
असं अतूट राहतं,
डोळे होउनिया नदी,
पाणी पळत वाहतं!

**बालाजी भानुदासराव कदम**
रा.सोमठाणा, ता.नायगाव,जि.नांदेड
मो. ९१७५७ ६९३९४

## भ्रम

मनापासून मैत्री करावी
पाकला कधी वाटलं नाही
दहशतवादी भेकडांवरचं
प्रेम त्याचं आटलं नाही

ज्याच्या मनात कपट आहे
भलतीच आहे अढी
त्याच्या कलाकारांच्या
गाण्यात काय गोडी

गाण्याने संबंध सुधारेल
हा तर निव्वळ भ्रम
भूतकाळ नीट पहाण्याचे
घ्यावेत थोडे श्रम

सत्तर वर्षांचे वाकडे शेपूट
अजून होईना सरळ
रोजच साप ओकतो आहे
जहाल विषारी गरळ !

**मुरारीभाऊ देशपांडे**, संगमनेर
मो. ९८२२०८२४९७

## कलयुगातील रामा

गांधी हत्या का हवी आता
हर घरात गोडसे जिवंत आहे

कलयुगातील रामा तुजसाठी
चर्चेला विषय ज्वलंत आहे

बापू तुमच्या आदर्शापूढे
कौरवांची संख्या अनंत आहे

झालास तू कृष्ण भारताचा
अर्जुनाची सत्ता निवांत आहे

फाळणीने आज ही सीमेवर
रक्त कोणाचे सांडत आहे

कोण हिंदू कोण मुस्लीम
कोण हा रोज भांडत आहे

सांगा बापू.. बोला बापू
दहशती काय मांगत आहे

रहस्य ते उलगडून टाका
गोडसे उगाच वादात आहे

**सचिन कृष्णा तळे**, पुणे मो. ७७०९० ९९६४६

## साप्ताहिक 'चपराक'साठी आपल्याही कविता अवश्य पाठवा.

संपादकीय कार्यालय
'चपराक', ६१७, साईकृपा,
पहिला मजला,शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता,
शुक्रवार पेठ, पुणे - २
भ्रमणध्वनी: ७०५७२ ९२०९२
ई-मेल: kavyapushp3@gmail.com

# एका सोंगाड्याला मिळाली शासनमान्यता

## हिरामण बडे नगरकर राज्य सांस्कृतिक पुरस्काराचे मानकरी

**गेल्या** तीस वर्षांहुन अधिक काळ सोंगाड्याच्या भूमिकेत तमाशा रसिकांना खळखळवून हसवणारे आणि आपल्या मंच प्रवेशानेच प्रेक्षकांच्या टाळ्या घेणारे कलावंत हिरामण बडे नगरकर यांना सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासानाच्या वतीने नुकताच राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०१५ जाहीर झालेला आहे. या पुरस्कारामुळे कलावंत हिरामण बडे नगरकर यांचा सन्मान होणे ही घटना अत्यंत औचित्यपूर्ण आहे. या पुरस्कारातून मिळणाऱ्या एक लाख रूपयातून श्री. बडे यांचे काही महिने सुखावह जाणार असले तरी कलावंतांच्या अखेरच्या दिवसावर प्रकाशझोतही या निमित्ताने पडतो.

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असणाऱ्या चिंचपूर पांगुळ या गावी हिरामण बडे नगरकर यांचे पूर्वज म्हणजे पणजोबा राहत होते. त्यांना काही जमीनही होती पण त्यांनी ती विकली. त्यामुळे व अंगभूत कलेमुळे हिरामण यांच्या वडिलांनी व आईने तमाशा कलावंत म्हणून काम करायला सुरूवात केली. हिरामणचा जन्म, बालपण आणि कारकिर्द सगळच तमाशामय झालेलं. मूळ गावाशी काहीच संबंध नाही. त्यांचे तिथे काहीही नाही.

तमाशातील मार्मिक विनोद करणारं, प्रेक्षकांना खळखळवून हसवणारं पात्र म्हणजे सोंगाड्या! ही सोंगाड्याची भूमिका गाजवत कधी नर्म विनोद तर कधी निखळ विनोद आणि अधूनमधून सवाल जवाब करत हिरामण बडे नगरकर आपली प्रतिमा तमाशा रसिकांच्या



मनात कायम करण्यात कमालीचे यशस्वी झाले. नगरकर यांच्या फडातील दीड-दोन वर्षे आणि आनंद महाजन यांच्या फडात दहा वर्षे सोंगाड्याची भूमिका केल्यानंतर गेली तीस वर्षे ते संगमनेरच्या रघुवीर खेडकर यांच्या तमाशा फडात सोंगाड्याची भूमिका करत आहेत. सोंगाड्याची भूमिका म्हटलं तर सध्यापर्यंत हिरामण बडे नगरकर यांचेच नाव घेतले जाते. डोक्यात हॅट, अंगात कोट, पॅन्ट, हातात काठी आणि डोळ्याला बिगर काचेचा चष्मा लावून हिरामणने स्टेजवर प्रवेश केला की काही शब्द उच्चारायच्या आधीच टाळ्यांचा कडकडाट होऊन जातो. प्रेक्षकांच्या टाळ्या हीच आपल्या आयुष्याची कमाई समजणाऱ्या कलावंताची शेवटच्या दिवसात जी कुचंबना होते त्या परिस्थितीला आता सत्तरीत असणारे हिरामण बडे नगरकर हे सामोरे जात आहेत; पण एकच चांगली गोष्ट त्यांच्या सोबतीला आहे ती म्हणजे त्यांची पत्नी सौ. उषा आणि दुसरे म्हणजे प्रेक्षकांचे प्रेम!

जगण्यासाठी केवळ प्रेमाने काम भागत नाही तर किमान गरजा भागविण्यासाठी काही अर्थाची गरज असते. नेमके त्याच वंचनेला त्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यांना भेटायला गेलो तेव्हा ते एका भाड्याच्या घरात राहत असल्याचे समजले. त्यांचा एक मुलगा किरण हा त्यांचा लोककलेचा वारसा मंगला बनसोडे यांच्या तमाशातून चालवत आहे. हे सगळे असले तरी बडे आपल्याच व्यथा उगळत नाहीत, तर आपल्याला रसिकांचे रंजन करता आले, गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे नाव उज्वल करता आले याचे समाधान त्यांना आहे. या कलावंताच्या सत्तरीत महाराष्ट्र शासनाने दिलेला हा पुरस्कार अत्यंत औचित्यपूर्ण असून इतर लोककलावंतांना प्रेरणा देणारा आहे. या निमित्ताने मोडकळीस आलेली तमाशा व्यवस्था, तिचे तुटके अर्थकारण, वेळेची मर्यादा, प्रेक्षकांची बदलती अभिरूची याचाही विचार करण्याची वेळ आली असून कलावंताप्रती शासन व समाज यांनी सौजन्य भावना जागवण्याची व प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित होत आहे.

– डॉ. कैलास दौंड, ९८५०६०८६११

## पुणे ते कन्याकुमारी सायकल रॅली

लोणी काळभोर, (वार्ताहर) : स्वानंद ॲडव्हेंचर ग्रुपतर्फे पुणे ते कन्याकुमारी हा दहा दिवसांचा सायकल रॅली २८ जानेवारीपासून पुण्यातून श्रीमंत दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेऊन सुरू झाला. १५२५ किलोमीटरचा हा प्रवास कराड, बेळगाव, उड्डुप्पी, कोचीन,



कोकण मार्गे दिनांक ६ फेब्रुवारीला कन्याकुमारीला पोहचेल.

या ग्रुपचे अध्यक्ष संजीव शहा म्हणाले की, पुण्यातील उद्योजक फक्त येऊन या ग्रुपची स्थापना केली जास्तीत जास्त तरूणांना सायकलीचे प्रोत्साहन देण्यासाठी व पर्यावरण वाचविण्यासाठी तसेच आपले शरीर तंदरूस्त ठेवण्यासाठी या सायकल रॅलीचे आयोजन केले आहे. सायकलींगमुळे ध्वनीप्रदुषण, वायुप्रदुषण होत नाही. सायकलींगमुळे इंधनाची बचत होते. त्यामुळे लाखो रूपये वाचतात. आम्ही दररोज ५० ते ६० किलोमीटर सायकल चालवतो. या आगोदर आम्ही पुणे ते दिल्ली सायकलप्रवास केला आहे.

या सायकल रॅलीमध्ये दशरथ जाधव (वय ५९), दिगंबर कोद्रा (वय ५७), विठ्ठल कुंजीर (वय ५७), संपत बडदे (वय ५२), अतुल मेहता (वय ५२), नवनाथ किसे (वय ५०), डॉ. अभिजीत रणवरे (वय४१), रणधीर टकले (वय ३६), विकास जकुणे (वय ३५), अविनाश कोद्रे (वय ३५) मंगेश काळे (वय ३५) मदन बोराना (वय २९) हे उद्योजक सायकल प्रवास करणार आहेत. त्यांना अनेक पुणेकरांनी शुभेच्छा दिल्या.


**आपणही 'चपराक'चे सभासद अवश्य व्हा!**

**वार्षिक वर्गणी**

साप्ताहिकासाठी २०० रुपये

मासिकासाठी ५०० रुपये (सर्व विशेषांकांसह)

आमच्या **www.chaprak.com** या वेबसाईटवर ऑनलाईन वर्गणी भरण्याची सुविधा आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

तुषार उथळे-पाटील मो. ९५५२८ ५८१००



## 'चपराक प्रकाशन'ची दर्जेदार ग्रंथसंपदा

आमची पुस्तके www.chaprak.com या वेबसाईटवरून आपणास ऑनलाईन मागवता येतील.












- **कोंबडं झाकणाऱ्या म्हातारीची गोष्ट (प्रतिवाद)** भाऊ तोरसेकर । ₹ १५०
- **दखलपात्र (अग्रलेख संग्रह)** घनश्याम पाटील । ₹ १५०
- **झुळूक आणि झळा (अग्रलेख संग्रह)** घनश्याम पाटील । ₹ १५०
- **कॉलेज गेट (कादंबरी)** सागर कळसाईत । ₹ २४४
- **मोरूनामा (विनोदी कादंबरी)** विजय तरवडे । ₹ १००
- **एमरल्ड ग्रीन (कथासंग्रह)** समीर नेर्लेकर । ₹ ७५
- **खुलजा सिम सिम (विनोदी कथा)** सदानंद भणगे । ₹ १००
- **हरजीबुवाच्या नावानं (कादंबरी)** उमेश सणस । ₹ १५०
- **टर्मिनस व्हिक्टोरिया (कादंबरी)** रमेश गोविंद वैद्य । ₹ १२०
- **श्रीराम एक चिंतन (वैचारिक)** नरहरी पत्तेवार । ₹ ८०
- **विज्ञानमूर्ती ज्ञानोबा तुकोबा (आध्यात्मिक)** दत्तात्रेय गायकवाड । ₹ १३०
- **थोडं मनातलं (लेख संग्रह)** विनोद श्री. पंचभाई । ₹ १२०
- **गढीचं गूढ (किशोर कादंबरी)** सुभाषचंद्र वैष्णव । ₹ ४०
- **चार शिलेदार (किशोर कादंबरी)** सुभाष कुदळे । ₹ ६०
- **नवलकथा (बालकथा)** सुभाष कुदळे । ₹ ४०
- **वाट इतकी सरळ (मर्माक्षरी संग्रह)** श्रीराम पचिंद्रे । ₹ ५०
- **भरारी एका आशावादी खेळाडूची (चरित्र)** आशा शिंदे । ₹ ७५
- **माझी लिखापडी (चरित्र)** परशुराम काळभोर । ₹ ५०
- **आविली फुले मोकळी (ललित संग्रह)** सदानंद भणगे । ₹ १५०
- **गंध माणसांचा (व्यक्ती चित्रण)** संजय वाघ । ₹ १३०
- **सत्यापितम् (कथासंग्रह)** चंद्रलेखा बेलसरे । ₹ १३०
- **शांतिदूत लालबहाद्दूर शास्त्री (चरित्र)** प्रभाकर तुंगार । ₹ ५०
- **एकनाथजी रानडे (चरित्र)** सागर सुरवसे । ₹ ७५
- **मुलांच्या मनातलं (बालकथा)** विनोद श्री. पंचभाई । ₹ ७५
- **दगडखाणीतील उद्ध्वस्त आयुष्य (कादंबरी)** हणमंत कुराडे । ₹ ७५
- **तपोभूमी नाशिक** रमेश पडवळ । ₹ २३०
- **भाषेचं मूळ (भाषाशास्त्र)** संजय सोनवणी । ₹ ११०
- **पाषाणगंध (नाटक)** सदानंद भणगे । ₹ ५०
- **बस नंबर बेचाळीस (कादंबरी)** सुभाष कुदळे । ₹ १००
- **आपले राष्ट्रसंत (चरित्र)** विनोद श्री. पंचभाई । ₹ ६०
- **लोकनायक सयाजीराव गायकवाड (चरित्र)** सौ. चंद्रलेखा बेलसरे । ₹ ७०
- **गजरा (कथासंग्रह)** दत्तात्रय वायचळ । ₹ १००
- **कवडसे (लेखसंग्रह)** स्वप्निल कुलकर्णी । ₹ ११०
- **चौथा स्तंभ (आत्मचरित्र)** सुभाष धुमे । ₹ १००
- **स्वा.सावरकरांचा मानवधर्म (वैचारिक)** सुधाकर द. जोशी । ₹ १२०
- **बाळासाहेब एक अंगार (चरित्र)** नागेश शेवाळकर । ₹ १७५
- **हसण्यावर टॅक्स नाही (हास्यचित्रे)** समीर नेर्लेकर । ₹ ६०
- **सारांश कथा (कथा संग्रह)** व्यंकटेश कल्याणकर । ₹ ५०

**संपर्क:** 'चपराक प्रकाशन', पुणे ४११ ००२

**भ्रमणध्वनी** - ७०५७२९२०९२ / ०२०-२४४६०९०९ Email : info@chaprak.com


'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्वांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक घनश्याम वसंतराव पाटील** (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय: 'चपराक', ६१७, साईकृपा, पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ भ्रमणध्वनी: ७०५७२ ९२०९२ ई-मेल: info@chaprak.com